follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 | वर्ष २५ | अंक २०१ | सातारा | शनिवार, दि. ३० मार्च २०२४ | पाने ६ (सुप्रभात) | किंमत ५/– रूपये

### ३१ मार्चपर्यंत महावितरणचे वीजबिल भरणा केंद्र सुरू

**पुणे :** चालू व थकीत वीज बिलांचा भरणा करणे सोयीचे व्हावे यासाठी पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील महावितरणचे अधिकृत वीजबिल भरणा केंद्र शुक्रवारी (दि. २९) ते रविवार (दि. ३१) पर्यंत सलग तीन दिवस सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सुरू राहणार आहेत. सध्या थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या मोहिमेला मोठा वेग देण्यात आला आहे. त्यासाठी ३१ मार्चपर्यंत वीजबिल भरणा केंद्र सुरू राहणार आहेत.

# पवारांना धक्का! श्रीनिवास पाटलांचा साताऱ्यातून लढण्यास नकार

**राजदंड / सातारा**

**साताऱ्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. साताऱ्यातील संभाव्य उमेदवार श्रीनिवास पाटील यांनी निवडणुक लढवण्यास नकार दिला आहे. श्रीनिवास पाटील हे शरद पवार यांचे निकटवर्तीय आणि जवळचे मित्र आहेत. उदयनराजे भोसलेंनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिल्यानंतर त्यांच्या जागी श्रीनिवास पाटील जिंकून आले होते. यंदाही त्यांनाच उमेदवारी मिळेल असं निश्चित मानलं जात होतं. मात्र त्यांनी अचानक माघार घेतल्याने आता शरद पवार गटाचा साताऱ्यातून उमेदवार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे.**



८३ वर्षीय श्रीनिवास पाटील यांनी प्रकृतीचं कारण देत नकार दिला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तब्बेत बरी नसल्याने आपण लोकसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छूक नाही असं श्रीनिवास पाटील यांनी कळवल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. श्रीनिवास पाटील यांनी मनधरणी केली जाईल असं बोललं जात आहे. मात्र त्यानंतरही श्रीनिवास पाटील यांचा नकार कायम राहिला तर शशिकांत शिंदे किंवा बाळासाहेब पाटील यांना शरद पवार गटातून साताऱ्यामधून उमेदवारी मिळू शकते अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. श्रीनिवास पाटलांना उमेदवारी दिल्यास साताऱ्यात पुन्हा शरद पवार गटाचाच खासदार असेल असा दावा येथील पक्ष कार्यकर्त्यांकडून केला जात होता. मात्र आता श्रीनिवास पाटील यांनी नकार दिल्याने शरद पवार गटासमोरील अडचणी वाढणार आहेत हे निश्चित.

विद्यमान खासदार असलेल्या श्रीनिवास पाटील यांची राजकीय वाटचाल फारच रंकज राहिली आहे. सनदी अधिकारी म्हणून कारकिर्दीस सुरुवात करणारे श्रीनिवास पाटील यांनी खासदारकीपासून राज्यपाल पदापर्यंत अनेक जबाबदाऱ्या पार पडल्या. त्यानंतर उदयनराजे भोसलेंनी भाजपामध्ये प्रवेश केला त्यावेळेस जिवलग मित्र असलेल्या शरद पवारांच्या मदतीसाठी श्रीनिवास पाटीलच धावून आले. सर्वात आधी शरद पवारांच्या शब्दाखातरच श्रीनिवास पाटलांनी सनदी अधिकारीपदाचा राजीनामा देऊन राजकारणात प्रवेश केला होता. श्रीनिवास पाटील हे कराड लोकसभा मतदारसंघातून दोन वेळा खासदार झाले. त्यानंतर त्यांनी सिक्कीमचे राज्यपाल म्हणून काम पाहिलं होतं.

शरद पवार १० जून १९९९ रोजी काँग्रेस पक्षातून बाहेर पडले आणि त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यानंतर अवघ्या २० दिवसांमध्ये म्हणजेच ३० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष झालेल्या शरद पवारांच्या सांगण्यानुसार श्रीनिवास पाटीलांनी भारतीय प्रशासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ऑक्टोबर १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत श्रीनिवास पाटील निवडणुकीच्या रिंगणात उतरले आणि कराड मतदारसंघाचे खासदार म्हणून निवडून झाले. २००४ साली ते दुसऱ्यांदा कराड मतदारसंघातून खासदार म्हणून लोकसभेत गेले. २००४ मध्ये महाराष्ट्रातील सर्व खासदारांपैकी सर्वाधिक मताधिक्याने जिंकून जाणारे ते दुसऱ्या क्रमांकाचे खासदार ठरले होते. २०१३ मध्ये भाजपची सत्ता असतानाही ते सिक्कीमचे राज्यपाल झाले. राज्यपालपदाच्या कार्यकाळामध्ये श्रीनिवास पाटील यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. २०१९ मध्ये सातारा लोकसभा पोटनिवडणुकीत त्यांनी विजय मिळवत तिसऱ्यांदा खासदार होण्याचा मान मिळवला.

शरद पवार पवासात भिजलेली आणि महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये आजही चर्चेत असलेली पावसातील सभा ही श्रीनिवास पाटलांसाठीच घेतलेली. त्यामुळेच आता पुन्हा एकदा शरद पवारांनी शब्द टाकल्यास श्रीनिवास पाटील आपला निर्णय बदलतात का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अजित पवारांनी यापूर्वी भाजपा विरोधात केलेली भाषणे खोटी होती काय?

## अजित पवारांना सामान्य जनतेचा विरोध - रोहित पवार

**राजदंड / भोर**

काही मंडळी स्वार्थासाठी सत्तेत गेली असली तरी कट्टर पदाधिकारी, कार्यकर्ते व कष्टकरी जनता महाविकास आघाडीच्या बाजूने आहेत.अजित पवारां नी यापूर्वी भाजपा विरोधात अनेक भाषणे केलेली आहेत. मात्र त्यांनी आता विचारधारणा बदलली असून ते स्वार्थासाठी भाजपाला साथ देत आहेत. मग यापूर्वी अजित पवार भाजपा विरोधात जी भाषणे करीत होते ती खोटी होती की काय ? त्यामुळे मलिदा गँगमध्ये सामील झालेल्यांना जनता नक्कीच धडा शिकवेल असे आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

गुरुवार दि.२८ रोजी भोर येथे बारामती लोकसभा मतदारसंघातील महा विकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या संवाद यात्रा व संवाद बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत आमदार रोहित पवार बोलत होते.

यावेळी काँग्रेसचे भोर विधानसभा आमदार संग्राम थोपटे, शिवसेना नेते कुलदीप कोंडे, माऊली शिंदे, विठ्ठल आवाळे, यशवंत डाळ, रवींद्र बांदल, मानसिंग धुमाळ, विठ्ठल शिंदे, राजेंद्र शेटे, अनिल पवार यांच्यासह तालुक्यातील प्रमूख पदाधिकारी व इतर कार्यकर्ते



उपस्थित होते.

रोहीत पवार म्हणाले की लोकांची घरे फोडायची, पक्ष फोडायचे ही निती महायुतीची आहे. ही मंडळी संविधान संपवण्यासाठी निघाले आहेत संविधान आहे म्हणुन आपण आहोत.अशा लोकां पासून सावध राहणे बरे. महविकास आघाडी ही फुले शाहू आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांना मानणारी असून लोकशाहीला जपणारी आहे तर महायुती हे दिल्लीतून आलेल्या हुकुमाची गुडघ्यावर बसून अमल बजवणारी आहे. अजित पवारांची प्रशासनावर असलेली पकड त्यांना माहीत असून त्यांनी जाणीव पूर्वक त्यांच्या गँगमध्ये त्यांना ओढून घेतले आहे. त्यामुळे पक्ष बदलणाऱ्या लोकांवर जनतेचा विश्वास राहिला नसून. त्यामुळे निवडनुक भावनिक केली जात आहे. भाजपा जनतेवर विश्वास नसुन जनतेवर ध्यान ठेवण्यासाठी त्यांनी माणसे ठेवली आहेत ही बाब कितपत योग्य आहे ?.

पुढे रोहीत पवार म्हणाले की प्रत्येक मतदार संघात औद्योगीक वसाहत व्हावी ही माझी इच्छा आहे व भोर तालुक्यात देखिल व्हावी यासाठी आमदार संग्राम थोपटे यांचे प्रयत्न सुरु असताना पूर्वी आमच्याकडे असणारे याच तालुक्यातील व सध्या मलिदा गँगमध्ये सामील झालेले आमच्या कानाला लागायचे काहीतरी सांगायचे, जमिनीला विरोध करायचे. तर माजी मंत्री जेष्ठ नेते अनंतराव थोपटे साहेब पुरोगामी विचारांचे असून निष्ठावंत व वाचनाचे पक्के आहेत. कीतीही वादळे आली तरी त्यांनी पक्षनिष्ठा आजही सोडली नाही व त्यांचा वारसा आमदार संग्राम थोपटे यांनी जपला आहे.

भाजपाचे नेते महाराष्ट्रातून उद्योगधंदे गुजरातमध्ये नेत आहेत. महाराष्ट्रात रोजंदारीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असतानाही अजित पवार भाजपाच्या सत्तेत जात असतील तर हे सामान्य जनतेला आवडले नसल्याने सामान्य जनता अजित पवाराच्या विरोधात आहे, असेही रोहित पवार म्हणाले.

# मोहोळ, धंगेकर यांना स्वत:च्या पक्षातूनच विरोध

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

भाजप पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ आणि काँग्रेसचे उमेदवार, आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर झाली. तेव्हापासून या दोघांनाही स्वतःच्या पाक्षातूनच विरोध होत आहे.

धंगेकर यांच्या विरोधात माजी उपमहापौर, जेष्ठ नगरसेवक आबा बागुल यांनी दंड थोपटले आहेत. निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय झाल्याची भावना बागुल यांनी व्यक्त केली आहे. काँग्रेसमध्ये २० जण लोकसभेला इच्छुक होते. त्यामध्ये अनेकांनी आपली हयात काँग्रेसमध्ये घालवली. त्यांना पाक्षाने डावलल्यामुळे नाराजीचा सूर उमटत आहे. उमेदवारी देताना केवळ कसबा पोटनिवडणुकीत विजय प्राप्त केला, म्हणून धंगेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. धंगेकर हे काही काँग्रेसचे निष्ठावन नाही. त्यांनी अनेक पक्ष बदलून काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्याची सल अनेक वरिष्ठ नेते मंडळींनी बोलून दाखविली आहे.

तर, दुसरीकडे मोहोळ यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर राज्यसभेचे माजी खासदार आणि भाजपचे नेते संजयनाना काकडे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मी एकजण नव्हे तर अनेक जण नाराज असल्याची भावना काकडे यांनी बोलून दाखविली आहे. या दोन्ही उमेदवारांना अंतर्गत नाराजीचा सामना करावा लागणार आहे.

मनसेचे नेते वसंतराव मोरे यांनी पक्षाला जय महाराष्ट्र करीत लोकसभा निवडणूक लढणार असल्याचा निर्धार केला आहे. मोरे यांनी वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. त्यामुळे ते वंचितमधून लढणार असल्याची चर्चा सुरू आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याच्या मुलावर हल्ला

**पुणे :** दांडेकर पूल भागात राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्याचा मुलावर दहा ते बारा जणाच्या टोळक्याने कोयत्याने हल्ला केला. त्याच्याबरोबर असलेल्या दोन मित्राना मारहाण करण्यास आली आहे. याप्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाण करणाऱ्या टोळक्यातील सहा जणांना पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत मयूर राम पालखे (वय २५, रा. दांडेकर पुल) याने फिर्याद दिली आहे. त्यानुसार धर्मादास कदम, चंद्रकांत कदम, निलेश कदम, अनिल लोंढे आणि साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मयूर हा पुणे महापालिकेत कामाला आहे. त्याचे वडील राम पालखे सामाजिक कार्यकर्ते असून त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आहेत. मयूर बुधवारी रात्री घरी निघाला होता. त्यावेळी आरोपीचा नातेवाईक असलेल्या एकाने त्याला धक्का दिला. मयूरने जाब विचारला. त्यानंतर आरोपी धर्मादास कदम आणि नातेवाईक एकत्र आले. त्यांनी मयूर यांना कोयता मारला आणि लाथा बुक्यांनी बेदम मारहाण केली.

# हुकूमशाही धर्मांध शक्तींचा पराभव करू : रवींद्र धंगेकर

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

सर्वांना सोबत घेऊन सर्वसमावेशक भूमिका घेऊ. तसेच, प्रचाराची आखणी करू आणि हुकूमशाही धर्मांध शक्तींचा पराभव करू, असा या बैठकीमुळे आत्मविश्वास वाढला असल्याचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी सांगितले.

पुण्यातील विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्ते यांची काँग्रेसचे पुण्याचे लोकसभा उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्याशी संवाद बैठक पुणे शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पुणे येथे आज संपन्न झाली.



सदर बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या नियोजना संदर्भात महत्वाच्या सूचना इंडिया फ्रंट आघाडीतील प्रमुखांकडून करण्यात आल्या.

महाविकास आघाडी, इंडिया आघाडी, भारत जोडो अभियान, यांची ध्येय धोरणे, संविधानाप्रती निष्ठा, लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाची भुमिका ठेऊन सर्व समाजघटकांना एकत्र घेऊन भारतीय जनता पक्षाचा आपण निश्चित पराभव करू अशी खात्री व्यक्त करण्यात आली.

या बठैकीस सामाजिक संघटनचे सुभाष वारे, अजित अभ्यंकर, संदिप ताम्हनकर, वसंत पवार, दत्ता पाकिरे, अन्वर राजन, संदिप बर्वे, इब्राहिम खान, अशोक तातुगडे, संदेश दिवेकर, दिपक पाटील, लता भिसे, अरविंद जक्का, प्रकाश पवार, आल्हाद पासलकर, जांबुवंत मनोहर, अनिस अहमद, प्रकाश भारद्वाज, प्रशांत कोठाडिया, ॲड. मोहन वाडेकर, किरण मोघे, निलम पंडित, अशोक साळवी, रंजना पासलकर, वसुधा जोशी, नितीन चव्हाण, सविता सोनवणे, वंदना गिर, एकनाथ पाठक, दत्तात्रय जाधव, स्मिता हेमलता, किरण पोकळे, यांसह महाविकास आघाडीतील वरिष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दरोडाच्या गुन्ह्यातील आरोपी ३७ वर्षापासून होता फरार, अखेर पोलिसांनी दाखवला 'कात्रज'चा घाट

**मुंबई :** मुंबईच्या शिवडी पोलीस ठाण्यात १९८३ मध्ये सशस्त्र दरोडा टाकल्या प्रकरणी शौकतअली इमाम शेख या आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी शौकत अली याला १९८३ मध्येच अटक करण्यात आली होती. त्यानंतर जामीन मिळाल्यावर फरार झाल्यानं आरोपी विरुद्ध सत्र न्यायालयानं १९८७ मध्ये स्टँडिंग अजामीनपात्र वॉरंट जारी केलं होतं. गेल्या ३७ वर्षापासून फरार असलेल्या या आरोपीला पुण्यातील कात्रज येथून अटक करण्यात शिवडी पोलिसांना यश आल्याची माहिती पोलीस उपायुक्त संजय लाटकर यांनी दिली आहे.

आरोपी विरोधात अतिरिक्त सत्र न्यायालय कोर्ट क्रमांक २२ मुंबई यांचेकडून स्टँडिंग अजामीनपात्र वॉरंट शिवडी पोलिसांना प्राप्त झाले होते. यानंतर पोलीस उपनिरीक्षक महाजन आणि टिबे, पोलीस शिपाई शेख आणि बडे हे रवाना झाले होते.

# ३१ मार्चपूर्वी पाणीपट्टी, मालमत्ता कर भरून सहकार्य करा - मुख्याधिकारी

**राजदंड / वडगाव मावळ**

वडगाव नगरपंचायतीच्या प्रशासकीय राजवटीत प्रशासनाकडून मालमत्ता कर पाणीपट्टी थकबाकीदारांकडून वसुली होण्यासाठी विशेष धडक वसुली मोहीम सुरू करण्यात आली आहे या विशेष धडक मोहिमेत पाणी पट्टी व मालमत्ता कर थकबाकी न भरणाऱ्या मिळकतीचे नळ कनेक्शन बंद करण्याची कारवाई केली जात आहे.

यावेळी या वसूली मोहिमे दरम्यान कारवाई टाळण्यासाठी वडगाव नगरपंचायत हद्दीतील नागरिकांनी थकीत मालमत्ता कर पाणीपट्टी तात्काळ भरावी असे आवाहन मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ प्रविण निकम यांनी केले आहे.

**अनाधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई**

शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी नगरपंचायत प्रशासनाने वारंवार सुचना करीत आहेत मात्र या दरम्यान विशेष तपासणी मोहीम राबवली असून, यात अनधिकृत कनेक्शन आढळल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाईसह फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निकम यांनी दिला आहे.

**सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरू राहणार**

नागरिकांना कर भरण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी कर संकलन विभागाच्या वतीने विशेष खबरदारी घेतली जात आहे. उद्या शुक्रवारी गुड फ्रायडे आणि शनिवार, रविवार महापालिकेला शासकीय सुट्टी आहे. मात्र, या तिन्ही दिवशी नागरिकांच्या सोयीसाठी कर संकलन कार्यालये सकाळी साडेनऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत कॅश काऊंटरवर मालमत्ता कराचा भरणा स्विकारला जाणार आहे, याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मुख्याधिकारी डॉ प्रविण निकम यांनी केले आहे.

**वडगाव नगरपंचायत हद्दीमध्ये पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात थकीत आहे. तसेच आगामी आर्थिक वर्षातही मिळकत कर आणि पाणीपट्टी थकीत असणा-यांचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येणार आहे. त्यामुळे ही निरंतर कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी ३१ मार्चपूर्वी पाणीपट्टी, मालमत्ता कर भरून नगरपंचायत प्रशासनाला सहकार्य करावे.**

**– डॉ. प्रविण निकम**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक,**
**वडगाव नगरपंचायत**

# सुप्रिया सुळेंचे आभार मानत रूपाली चाकणकरांची खोचक टीका

**राजदंड / पुणे**

रुपाली चाकणकर म्हणाल्या, अजित पवारांनी खासदार सुप्रिया सुळेंचा प्रचार केला. त्यांनी निवडून आणलं हे सुप्रिया सुळे पवार यांनी अखेर मान्य केलं. त्याच्याबद्दल मी त्यांची मनापासून आभारी आहे, अशी खोचक टीका राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्ष आणि महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी सुप्रिया सुळे पवार यांच्यावर केलीय. सुप्रिया सुळे यांनी ''माझ्या वेळेस एवढं फिरावं लागत नव्हतं, माझा प्रचार करण्यासाठी अजित पवार फिरत होते, '' असे वक्तव्य केलं होतं. त्याला आता रुपाली चाकणकरांनी प्रत्युत्तर दिलेय.

रुपाली चाकणकर म्हणाल्या, ''अजित पवारांना त्यांना निवडून आणण्यासाठी किती कष्ट करावे लागत होते, हे उभ्या महाराष्ट्राला माहित आहे. पण अजित पवारांनी त्यांच्यापर्यंत ते कधी पोहोचू दिलं नाही. इतकी भावाची माया दिली. खरंतर अनेकांचा विरोध पत्करुन अजित पवारांनी पंधरा वर्षे सुप्रिया सुळे यांना निवडून आणलंय. आम्ही त्याचे साक्षीदार आहोत. त्यांनी पंधरा वर्षे प्रचार केलेला आहे. या सगळ्यांमध्ये पंधरा वर्षे भाऊबीजेची ओवाळणी म्हणून खासदारकी दिलीय.'' तसंच या सगळ्या गोष्टींवर त्यांचं समाधान व्हायला हवं होतं, असंही रुपाली चाकणकर म्हणाल्या आहेत. ''बारामती लोकसभेत अजित पवारांनी केलेली विकास कामं मोठ्या प्रमाणात आहेत. चांगल्या प्रमाणात निधी दिलेला आहे. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी प्राधान्यक्रम दिला,'' असे चाकणकर यांनी म्हटले.

विजय शिवतारे यांच्या बंडावर प्रतिक्रिया देताना चाकणकर म्हणाल्या, '' शेवटी हे राजकारण असतं. त्याच्यात मताचे प्रवाह वेगवेगळे असतात. शेवटी एक विचारानं एकत्र येतात. ही राजकारणाची सुरुवात आहे. साहजिकच विजय शिवतारेंनी जे बंड पुकारलं होतं, ते त्यांनी मागं घेतलेलं आहे. ते महायुती सहभागी झालेले आहेत.

# ८४० कोटींच्या विमान खरेदी घोटाळ्यातून प्रफुल्ल पटेलांना 'क्लिन चीट'

**राजदंड / मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते व राज्यसभा खासदार प्रफुल पटेल यांना सीबीआयनं क्लीनचीट दिली आहे. त्यामुळं पटेल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सीबीआयनं दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) याप्रकरणी क्लोजर रिपोर्ट दाखल केला. २०१७ मधील एका भ्रष्टाचार प्रकरणात प्रफुल्ल पटेल यांच्याविरोधात कोणताही सबळ पुरावा नसल्याचे सीबीआयने कोर्टात सांगितले आहे. मात्र या निर्णयावरुन काँग्रेसह विरोधी पक्षांनी सरकावर टीकेची झोड उठवली आहे.



लोकसभा निवडणुकीआधी अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. एअर इंडियाचे विमान भाडेतत्त्वावर देण्याच्या ८४० कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याचा तपास सीबीआयने बंद केला आहे. अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले की, 'कोणत्याही गैरकृत्याचा कोणताही पुरावा नाही, त्यामुळे सीबीआयने या प्रकरणात क्लोजर रिपोर्ट दाखल केला आहे. त्यामुळे एअर इंडिया-इंडियन एअरलाइन्स विलीनीकरण प्रकरणात सीबीआयने त्यांच्याविरुद्ध क्लोजर रिपोर्ट दाखल केला आहे.

याप्रकरणी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारमध्ये नागरी विमान वाहतूक मंत्री असलेले पटेल आणि एअर इंडियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर भ्रष्टाराचाराचे आरोप करण्यात आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, नॅशनल एव्हिएशन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड स्थापन करण्यासाठी एअर इंडिया आणि इंडियन एअरलाइन्सच्या विलीनीकरण करण्यात आलं होतं. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात विमाने भाड्याने घेतली गेली आणि एअरबस आणि बोईंगकडून १११ विमाने खरेदी केली. याशिवाय परदेशी विमान कंपन्यांना नफा कमावण्याचा रस्ता मोकळा करुन देण्यात आला. या निर्णयामुळे परदेशी गुंतवणुकीने प्रशिक्षण संस्था उघडण्यात भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही करण्यात आला. त्यावेळी प्रफुल्ल पटेल यांचा कथित मित्र दीपक तलवार याच्याविरुद्धध या सर्व प्रकरणांचा तपास करण्यासाठी सीबीआयने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मे २०१७ मध्ये चार एफआयआर नोंदवले होते.

२९ मे २०१७ रोजी या प्रकरणी नोंदवलेल्या पहिल्या एफआयआरमध्ये सीबीआयने आरोपीच्या जागी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या अज्ञात अधिकाऱ्यांसह प्रफुल्ल पटेल यांच्या नावाचाही उल्लेख केला होता. सीबीआयच्या पहिल्या एफआयआरमध्ये तत्कालीन नागरी विमान वाहतूक मंत्री प्रफुल्ल पटेल यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणात विमाने भाड्याने घेतल्याचे म्हटले होतं. हे काम करण्यापूर्वी बाजाराचा विचार करण्यात आला नाही आणि या कामात अप्रामाणिकपणा करण्यात आल्याचे एफआयआरमध्ये म्हटले होते.

# बाणेर, बालेवाडी विभागातील कार्यकर्ते लागले कामाला!

**राजदंड न्यूज नेटवर्क / बाणेर, बालेवाडी**

बाणेर, बालेवाडी, पाषाण विभाग हा भाजपाचा गड तर काही प्रमाणात राष्ट्रवादी (अजित पवार) चा गड; परंतु राष्ट्रवादी आणि त्यांचे सहयोगी पक्षाकडून युतीचा धर्म पाळला जातो का? याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

पुणे भाजपा महायुतीचे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ तसेच कॉंग्रेस आघाडी कडून रविंद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर झाली असता बाणेर, बालेवाडी, पाषाण विभागातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी कामाला लागले आहेत. भाजपाचे पदाधिकारी घरोघरी जाऊन भेटी देत आहेत. भाजपाकडून माजी नगरसेवक अमोल बालवडकर, माजी नगर सेविका ज्योती कळमकर, युवा नेते लहू बालवडकर, गणेश कळमकर, माजी नगरसेविका स्वप्नाली सायकर हे हा मतदारसंघ पिंजून काढतांना दिसतात. राष्ट्रवादी गटातील सध्यातरी माजी नगरसेवक बाबूराव चांदेरे यांनी यूतीचा धर्म आम्ही पाळणार, असे सांगितले असले तरी राहुल बालवडकर, डॉ. सागर बालवडकर, माजी नगरसेविका पूनम विधाते, नितीन कळमकर, समिर चांदेरे हे सध्यातरी पूढे आले नाही किंवा अजित पवार काय सांगतात याची ते वाट पाहत असल्याचे दिसते. कॉंग्रेस आणि शिवसेना (ठाकरे गट) यांचा या मतदारसंघात मतदार नसल्यासारखे आहे तरी पण हे सभा घेऊन रविंद्र धंगेकर यांच्याकरिता एकजूट झालेले दिसतात. कॉंग्रेसचे जीवन चाकणकर, वृषाली चाकणकर, शिवसेनेचे (ठाकरेगट) नितीन चांदेरे, राजेन्द्र धनकुडे, राजेंद्र पळसकर हे पुढे सरसावले दिसत आहे.






> **या विभागात मेट्रोची कामे सुरू असून अरूंद रस्ता यामुळे वाहन चालविताना खड्डे वाचवित वाहन चालवावे लागते तर काही ठिकाणी रस्त्यांची कामे पूर्ण झालेली नाहीत. अर्धवट कामांमुळे त्रास सहन करावा लागतो. खड्डे बुजविण्यात यावीत आणि अपूर्ण कामे पूर्ण करावीत.**
> **– वाजित बागवान, रिक्षाचालक, बाणेर**

बालेवाडी, बाणेर हा विभाग स्मार्ट सिटी म्हणून गणला जातो '' भाजपाचे माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांनी अनेक रस्त्यांचे कामे मार्गी लावले आहे विकास कामे खेचून आणण्याची क्षमता यांच्यात आहे'' कोणत्याही ठिकाणी गड्डे पडलेले असो की कचरा साचलेले असो यांची गाडी आणि टिम सदैव तयार असते यांची कोरोना काळातील जनतेला केलेले सहकार्य हे उल्लेखनिय काम आहे कोठे ब्रिज बांधायचा तसेच कोठला रस्ता पूर्ण करायचा आणि तो मंजूर कसा, कोणत्या प्रकारे आणायचा शेवट पर्यंत मार्गी लावण्याचे धाडस यांच्यात आहे ''टीमवर्क,गोरगरीबा पर्यंत पोहचण्याची क्षमता''जनता पिण्याच्या पाण्या पासून वंचीत राहू नये म्हणून यांनी वेळोवेळी उचलेली पावले हेच भाजपा करिता आज वरदान ठरणार आहे'' भाजपाचे माजी नगरसेविका ज्योती कळमकर आणि गणेश कळमकर हे सदैव जनतेच्या कोणत्याही कामात,सूख दुःखात सदैव पूढे असतात यांचे सामाजिक कामाचा आढावा फार मोठा आहे सदैव अमोल बालवडकर यांच्या खांद्याला खांदा लावून अनेक कामात हजर राहतात'' कोविड काळात जनते करिता अनेक कामे केली'' भाजपाचे यूवा नेते लहूजी बालवडकर सोशल वेलफेअरचे अध्यक्ष भाजपाचे कट्टर समर्थक आपल्या सामाजिक कार्यात हे सदैव तत्पर असतात यांचे या विभागात अनेक उल्लेखनिय कामे आहे'' आरोग्य शिबिर, वारकरी साठी रूग्णसेविका, चैत्यंन्य स्पर्श पादूका दर्शन सोहळा,विविध क्रिडा स्पर्धा, मोफत लसीकरण अभियान,पॅन कार्ड,आधार कार्ड,रेशन कार्ड गोरगरिब जनते करिता सेवा , स्पर्धा परिक्षा , कोरोना काळातील यांचे उल्लेखनिय कामे यामुळे अशा भाजपा पदाधिकारी मूळे मतदारांची मने आणि मते वळविण्याची क्षमता यांच्यात असल्याचे दिसते.

> **दरवर्षी पिण्याच्या पाण्याकरिता तोंड द्यावे लागते. समान दाबाने पाणीपुरवठा होत नाही. रात्री बेरात्री पाणीपुरवठा करणे, तर कधी कधी चार चार दिवस पाणी न येणे, यासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. योग्यरित्या पाणीपुरवठा करण्यात यावा आणि पाणी सोडणाऱ्या कामगारांवर नियंत्रण ठेवून त्यांच्यावर अधिकारी यांनी लक्ष ठेवावे, मगच आमचे मतदान सार्थकी लागेल.**
> **– मंगेश बावस्कर, रहिवाशी बालेवाडी.**

## आनंदराज आंबेडकर यांना अमरावतीत 'बहुजन संग्राम'चा पाठिंबा

**राजदंड / मुंबई**



रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आणि इंदू मिल स्मारक लढ्याचे नायक असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर हे अमरावती येथे लोकसभा निवडणूक रिंगणात उतरत आहे. त्यांच्या या निर्णयाचे स्वागत करत बहुजन संग्राम संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भीमराव चिलगावकर यांनी आनंदराज यांच्या उमेदवारीला आज पाठिंबा जाहीर केला.

आनंदराज आंबेडकर यांना अमरावतीच्या अनुसूचित जाती राखीव मतदारसंघात महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी यांनीही पाठिंबा देवून लोकसभेत निवडून पाठवावे, असे आवाहन चिलगावकर यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.


येत्या मंगळवारी २ एप्रिल २०२४ रोजी आनंदराज आंबेडकर हे अमरावती येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यानंतर आपण स्वतः बहुजन संग्रामच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह त्यांच्या प्रचार सभासाठी अमरावती मतदारसंघात जाणार आहोत, अशी माहिती त्यांनी पत्रकात दिली आहे.

# बापट यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यकर्त्यांनी केले अभिवादन...

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

सर्वसामान्य कार्यकर्ता ते खासदार असा राजकीय प्रवास करणारे, पुण्याच्या राजकीय संस्कृतीतील अभ्यासू, अजातशत्रू व्यक्तिमत्व, लोकनेते दिवंगत खासदार स्व. गिरीशभाऊ बापट यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन कार्यकर्त्यांनी केले.

पुण्यनगरीचे लोकनेते, संघर्षशील, अष्टपैलू नेतृत्व, स्फूर्तीस्थान स्व. गिरीशभाऊ बापट यांच्या प्रतिमेस प्रथम पुण्यस्मरणानिमित्त पुष्पहार अर्पण करून भाजपचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी अभिवादन केले. स्व. गिरीशभाऊंच्या निवासस्थानी हे अभिवादन केले. काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनीही बापट यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन केले.



सोशल मीडियावर बापट यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. कार्यकर्त्यांनी जुने फोटो पोस्ट करून आठवणींना उजाळा दिला. दरम्यान, एकेकाळी बापट यांनी पुण्याचे नेतृत्व केले. अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी संधी दिली. खासदार म्हणून निवडून आल्यानंतर बापट यांनी शासनाच्या विविध योजना राबविण्यासाठी प्रयत्न केले. कार्यकर्त्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी प्रयत्न केले.

# कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी महिला कलाकारांनी जरूर संपर्क करावा - खा. मेधा कुलकर्णी

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

निवेदिता प्रतिष्ठानचं २५ वे वर्ष आहे आणि प्रतिष्ठाना तर्फे वेगवेगळ्या कलाक्षेत्रातल्या महिलांना घेऊन काम करण्याचा त्यांचा हा मानस खूप छान आहे. विविध कलाक्षेत्रातील महिला एकाच व्यासपीठावर आणणं आणि एवढ्या महिलांना इतके वर्षे एकत्रित ठेवणं हा अनुराधा ताईंचा उपक्रम खूप छान आहे. अशा कलाकारांच्या पाठीशी मी नेहमीच असते. मी स्वतः राजकारणात काम करणारी स्त्री असली तरीही मी स्वतः एक रसिक आहे. कलाकारांची दाद मी नेहमीच देत असते आणि यापुढे कोणत्याही कलाकार महिलांना कुठल्याही प्रकारची मदत लागल्यास त्या माझ्याशी संपर्क करू शकतात. मी कोणत्याही प्रकारची मदत करायला तयार आहे असे मत खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. निवेदिता प्रतिष्ठान तर्फे आयोजित ५ दिवसांच्या ललना कला महोत्सवाच्या उद्घाटना प्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी उद्योजिका डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील (अकलूज) आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नर्तक पं. डॉ. नंदकिशोर कपोते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.तसेच लोकमान्य मल्टीपर्पज को-आप सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष किरण ठाकूर, वर्ल्ड क्लासिक पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप मिळवणाऱ्या नीता मेहता आणि इंटरनॅशनल पॉवरलिफ्टर ज्योती भाडेकर आणि रजनी अंतापुरकर याप्रसंगी विषेश निमंत्रित म्हणून उपस्थित होत्या. हा कार्यक्रम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन, पद्मावती येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.



दीपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरवात झाली निवेदिता प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. अनुराधा भारती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. त्या म्हणाल्या की निवेदिता प्रतिष्ठानचे यंदाचे रौप्य महोत्सवी २५ वे वर्ष असून. ललना कला महोत्सवाचे यंदाचे ११ वे वर्ष आहे नृत्य, गायन, वादन, चित्रकला, नृत्यकला, क्रीडा या क्षेत्रातील महिलांना प्रोत्साहन देणारे हे व्यासपीठ आहे.

याप्रसंगी 'ललना कलारत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आले त्यामध्ये 'स्टार प्रवाह'फेम बालगायिका श्रुती भांडे (वय ९, अकोला), भरतनाट्यम् नृत्यांगना मिताली नाईक (गोवा), कथ्थक नृत्यांगना डॉ. नीलिमा हिरवे (पुणे), 'इन लाइन फ्री स्टाइल स्केटिंग'मध्ये आशियाई चॅम्पियशिप पटकाविणाऱ्या श्रेयसी जोशी (वय १५, पुणे) व स्वराली जोशी (वय १७, पुणे) आणि प्रख्यात चित्रकार रुही अन्वर कुरेशी यांचा समारंभपूर्वक गौरव करण्यात आला.

याप्रसंगी उद्योजिका डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले त्यामध्ये नृत्य, काव्य व चित्रकला या माध्यमातून सादर होणारा 'पंचतत्त्व आणि स्त्री' कार्यक्रम 'आकृती'ग्रुप तर्फे सादर झाला. नाट्यछटा व कथा या माध्यमातून भारतातील शूर व धाडसी महिलांवर आधारित 'ऐतिहासिक वीरांगना' कार्यक्रम 'कथासाखी' ग्रुप तर्फे सादर झाला. भरतनाट्यम् नृत्याद्वारे 'महिषासुरमर्दिनी व भैरवी शतकम्' हा कार्यक्रम राम वाळिंबे व मुक्ताताई भागवत यांनी सादर केला, कथ्थक नृत्याद्वारे 'नवदुर्गा' हा कार्यक्रम 'कलापद्म अकॅडमीच्या' कलावंतानी सादर केला आणि ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रहमान यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' मिळाल्यानिमित्त त्यांच्यावर चित्रित गाण्यांवर आधारित 'रंगीला रे' हा गाणी व नृत्याचा कार्यक्रम 'निवेदिता प्रतिष्ठान' व 'नृत्यांजली कथक ग्रुप' यांनी सादर झाला.

सूत्रसंचालन ॲड. अनुराधा भारती व श्रुती दातार यांनी केले.

# राष्ट्रवादी पश्चिम महाराष्ट्र औद्योगिक सेलच्या विभागीय कार्याध्यक्षपदी नितीन शिंदे

**राजदंड / सातारा**

राष्ट्रवादी पश्चिम महाराष्ट्र औद्योगिक सेलच्या विभागीय कार्याध्यक्षपदी नितीन रामचंद्र शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सातारा जिल्हा हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजला जातो. येथे यशवंत विचारांना मानणारा मोठा गट सक्रिय आहे. राष्ट्रवादीने प्रथमपासूनच साताऱ्यावर भक्कमपणे पकड ठेवली असून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संपूर्ण लक्ष हे साताऱ्यातील राजकारणावर प्रथमपासूनच राहिले आहे. अजित पवार यांच्याकडून नेहमीच पदाधिकारी-कार्यकर्त्यांना ताकद देण्याचे काम होत असते. तसेच त्यांची जिल्ह्यातील प्रत्येक बारीक-सारीक बाबींवरही लक्ष असते.



सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादी अजित पवार गट अधिक जोमाने निवडणुकीच्या प्रचारात कार्यरत आहेच. परंतू त्याला अधिक बळकटी देण्यासाठी राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष अमित कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकाधिक कार्यकर्ते राष्ट्रवादीच्या झेंड्याखाली एकवटत आहेत. त्यातूनच राष्ट्रवादी पश्चिम महाराष्ट्र औद्योगिक सेलच्या विभागीय अध्यक्षपदी बेलवडे, ता. जावली गावचे सुपूत्र नितीन रामचंद्र शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एका कार्यक्रमात राष्ट्रवादी औद्योगिक सेलचे महाराष्ट्र अध्यक्ष सुभाष मालपाणी यांनी शिंदे यांची पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष म्हणून निवड केली आहे.

नितीन शिंदे यांनी याआधी दलित महासंघाचे जिल्हाध्यक्षपद, त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादीच्या जिल्हा खजिनदार पदावर अत्यंत जबाबदारीने काम केले आहे. त्यांची काम करण्याची तळमळ पाहून खा.श्री.छ. उदयनराजे यांनी त्यांची राजे प्रतिष्ठानच्या महाराष्ट्र कार्याध्यक्षपदी निवड केली. त्यानंतर आज त्यांची राष्ट्रवादी पश्चिम महाराष्ट्र औद्योगिक सेलच्या विभागीय कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडीबाबत बोलताना नितीन शिंदे म्हणाले, राष्ट्रवादीचे काम मी याआधीपासूनच करीत होतो. मात्र, आता अजितदादा पवार यांची खंबीर साथ, अमित कदम यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळत असल्यामुळे सातारा जिल्ह्यात राष्ट्रवादीचे यशवंत विचार घरा-घरांत पोहोचविण्यासाठी आणि पक्षवाढीबरोबरच औद्योगिक क्षेत्रात राष्ट्रवादीला बळकटी देण्याचे काम करणार आहे.

नितीन शिंदे यांना नियुक्तीपत्र देताना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सातारा जिल्हा कार्याध्यक्ष अमित कदम, राष्ट्रवादीचे सरदार (सागर) भोगांवकर, सातारा तालुका उपाध्यक्ष सनी काटे, जिल्हा सह सरचिटणीस संदीप भोसले, औद्योगिक सेलचे जिल्हाध्यक्ष प्रेमराज शिंदे, सामाजिक न्याय सेल चे भालचंद्र बनसोडे, आदित्य जगताप, जावली तालुकाध्यक्ष साधू चिकणे, सातारा तालुकाध्यक्ष शशिकांत वाईकर, ॲड बाळासाहेब बाबर, लोकजनशक्ती पार्टीचे करन गायकवाड तसेच पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीबद्दल नितीन शिंदे यांची विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट घेवून तसेच भ्रमणध्वनीद्वारे त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## शिक्षक संघाच्या जिल्हा कोषाध्यक्षपदी सुषमा कदम यांची निवड

**राजदंड / मेढा**



अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ (शिवाजीराव पाटील प्रणित) शिक्षक संघटनेच्या जिल्हा कोषाध्यक्षपदी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भांडेवाडी (ता.कोरेगाव)येथील शिक्षिका सौ. सुषमा कदम यांची निवड करण्यात आली आहे.

सुषमा कदम या उपक्रमशील शिक्षिका म्हणून जिल्ह्यात ओळखल्या जातात. २००२ पासून त्या शिक्षक संघामध्ये शिक्षक संघाचे नेते सिद्धेश्वर पुस्तके यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. संघाच्या नूतन कार्यकारिणीत बदल करण्यात आला असून या जिल्हा कार्यकारिणीत जिल्हा कोषाध्यक्षपद सुषमा कदम यांना देण्यात आले आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल संघाचे नेते सिद्धेश्वर पुस्तके, बजरंग वाघ, प्रवीण घाडगे, अरुण घोरपडे, मोहन निकम, प्रमोद देशमुख,अविनाश जाधव, दादा थोरात,साबिरा मुल्ला मॅडम, किरण भांडवलकर, सुषमा आलेकरी, वैशाली डोईफोडे, नेहा कुलकर्णी,कमल फाळके, लीना पोटे, दादासाहेब सरकाळे, आदींनी अभिनंदन केले.

# दिंडेवाडी रस्त्याचे काम पूर्ण करा, अन्यथा मतदानावर बहिष्कार घालण्याचा ग्रामस्थांचा इशारा

**काळगाव फाटा -दिंडेवाडी रस्त्याचे काम रखडले : ग्रामस्थ आक्रमक**

**संजय कांबळे**

**राजदंड / पाटण**

ग्रामपंचायत गुढे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या आडमुठेपणामुळे दिंडेवाडी रस्त्याचे काम राजकीय द्वेषातून अपूर्ण ठेवण्यात आले असून यामुळे ग्रामस्थांची मोठी गैरसोय झाली असून सदर रस्त्याचे काम येत्या आठ दिवसांत पूर्ण व्हावे अन्यथा होणा-या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावरती सर्व दिंडेवाडी ग्रामस्थ बहिष्कार घालू असा इशारा दिंडेवाडी (गुढे) ता. पाटण येथील ग्रामस्थांनी प्रशासनास दिला असून याबाबतचे लेखी निवेदन पाटणचे प्रांताधिकारी सुनील गाढे यांना देण्यात आले आहे.

या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री शंभुराज देसाई, जिल्हाधिकारी सातारा , तहसिलदार पाटण यांना देण्यात आल्या आहेत.



निवेदनात म्हटले आहे की कराड -ढेबेवाडी रस्त्यापासून काळगाव फाटा उत्तरेकडे एक किलोमीटर दिंडेवाडीचा रस्ता आहे वाडीसाठी जाणार हा एकमेव रस्ता असून तो रस्ता २००९ साली एका खातेदाराने अडवलेला होता, तो अकरा वर्ष न्यायालयीन निकालानंतर तत्कालीन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी कायदेशीर बाबी पूर्ण करून २३ जुन २020 रोजी रस्त्यातील अतिक्रमण काढून टाकलेले आहे, असे असताना नामदार शंभूराज देसाई यांनी २५/१५ योजनेतून रक्कम रुपये १५ लाख फंड उपलब्ध करून दिलेला आहे व रस्त्याचे काम अर्धवट स्वरूपात झालेले आहे. ज्या ठिकाणची अतिक्रमण काढण्यात आलेले होते त्या साधारण २५ ते ३० मीटर अंतरावरील रस्त्याचे काम केले गेले नाही व मंजुरी पेक्षा अत्यल्प स्वरूपात रस्त्याचे काम केलेले आहे सदर बाब कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम) यांना आम्ही निवेदनाद्वारे कळविले असता त्यांनी आम्हास ग्रामपंचायतीने या ठिकाणाबाबत न्यायालयीन खटला चालू असल्याचे सांगितले मात्र सदर ठिकाणी कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नसून या जागेतील अतिक्रमण काढून रस्ता पूर्णपणे वापरात आहे, तसेच ग्रामपंचायत दप्तरी नमुना नंबर २६ ला नोंद आहे मात्र ग्रामपंचायत व बांधकाम विभाग यांच्या आडमुठेपणामुळे रस्त्याचे काम अपूर्ण ठेवण्यात आले असून येत्या आठ दिवसात तातडीने रस्त्याचे काम सुरू करून ग्रामस्थांची ये-जा करण्याची गैरसोय टाळावी अन्यथा लोकसभा निवडणुकीवरच बहिष्कार घालण्याचा इशारा दिंडेवाडी ग्रामस्थांनी दिला आहे. याबाबतच्या निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते अविनाश महिंदकर यांच्या सह ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

# यशेंद्र क्षीरसागर यांना 'सातारा प्राईड' पुरस्कार प्रदान!

**राजदंड / कोरेगाव**

विविध क्षेत्रात आपल्या सर्जनशील कर्तृत्वाने आणि कल्पक कृतीने आपल्या नावाची छाप उमटवून साताऱ्याला कर्तृत्वाच्या क्षितिजावर वेगळी झळाळी प्राप्त करून देणाऱ्या मान्यवरांचा सत्कार 'सातारा फाउंडेशन' तर्फे दिमाखात करण्यात आला. यामध्ये कवी, साहित्यिक, प्रसिद्ध वक्ते कोरेगाव पंचायत समितीचे सांख्यिकी विस्तार अधिकारी यशेंद्र क्षीरसागर यांचा ''सातारा प्राइड २०२४ ''पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी फाउंडेशनचे अली मुजावर तसेच वसंतशेठ जोशी, श्रीरंग काटेकर, बाळासाहेब जगदाळे, संतोष जाधव, किरण यादव, पत्रकार, मोठ्या प्रमाणावर नागरिक मान्यवर उपस्थित होते.

श्री. क्षीरसागर यांनी विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. गरीब मुलांना ते मोफत अध्यापन करतात. सलग २५ तास अध्यापन करण्याचा त्यांनी विश्वविक्रम केला आहे. ३०६८ ओळींची सर्वात मोठी कविता लिहून लिमका बुक मध्ये विक्रम नोंदविला आहे. शेकडो व्याख्याने ते विविध घटकांसमोर देऊन सातत्याने प्रबोधन करीत असतात. त्यांची भारतीय संस्कृती, मनातली वादळे आणि विचारांचे चांदणे अशी तीन पुस्तके प्रसिद्ध आहेत. कविता, लेख याद्वारे ते सामाजिक घडामोडींवर भाष्य करीत असतात. प्रभाकर सामान्यज्ञान दिनदर्शिका हा नावीन्यपूर्ण उपक्रम खास विद्यार्थ्यांसाठी त्यांनी सुरू केला असून तो महाराष्ट्रातील पहिलाच आहे. संत साहित्याचे ते अभ्यासक असून शासकीय अधिकारी म्हणून काम करत असतानाच कोरोना नियंत्रण कक्ष, निवडणूक अधिकारी या नात्याने देखील त्यांनी भरीव काम केले असून संबंधित अधिकाऱ्यांकडून ते प्रशंसेस पात्र ठरले आहेत. हा सर्व विचार करून त्यांची सातारा प्राईड पुरस्काराची निवड करण्यात आली असे संयोजकांनी सांगितले.




यावेळी प्रभा भोसले, अनिरुद्ध जगताप, श्रीकांत देशमुख, किरण बाबर, अमर कोल्हापुरे ,राजेंद्र घुले यांचा देखील सत्कार करण्यात आला. ''मानवता, आपुलकी अशा मानवी मूल्यांचा प्रसार भौतिक प्रगती सोबतच नवनिर्मित भारतासाठी आवश्यक आहे. ज्याला आयुष्यात काही मिळाले आहे, त्यांनी ते समाजाला देण्याचा प्रयत्न करावा .संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांची शिकवण कायम लक्षात ठेवावी'', असे प्रतिपादन सत्काराला उत्तर देताना श्री.क्षीरसागर यांनी केले.

# मेणवली गावची कचरा मुक्तीकडे यशस्वी वाटचाल

**राजदंड / वाई**

मेणवली विकास सेवा सोसायटी व वाई रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम परिवर्तन संकल्पनेतुन कचऱ्यापासून सेंद्रिय खत निर्मिती करण्याच धाडसी पाऊल टाकले आहे आपल्या परिसरातील व घरातील ओला सुका कचरा उघड्यावर न टाकता एका ड्रममध्येएकत्रित करून सेंद्रिय खताची निर्मिती करत कचरामुक्त गाव योजना गावात राबवल्याने मेणवली गावची कचरा मुक्तीकडे यशस्वी वाटचाल सुरू केली आहे.

वाई रोटरी क्लबच्या सहकार्याने मेणवली सोसायटीने ग्राम परिवर्तनाच्या नांदीला सुरवात करताना ना नफा ना तोटा या तत्वावर बाजार दराच्या तुलनेत कमी दराने सभासदांना शेती कामासाठी ट्रॅकर, रोटावेटर,पेरणी यंत्र व मळणी मशीनची सेवा उपलब्ध करून दिली आहे.

त्याच बरोबर सोसायटीने स्वच्छतेचे एक पाऊल पुढे टाकत मेणवली गावात कचरा निर्मूलन साठी प्लास्टिक ड्रमचे मोफत वाटप करण्यात आले आहे.



प्रत्येक घरी या ड्रमच्या माध्यमातून घरातील शिल्लक ओला व सुका कचरा वापरून सेंद्रिय खताची निर्मिती करून मेणवली गाव कचरामुक्ती कडे वाटचाल करत आहे घरातील कचऱ्या पासून तयार झालेल्या खतामधून शेतातील कांदा लसूण पालेभाज्या व इतर पिकांची उत्पादन क्षमता वाढली असल्याचा अनुभव अनेक शेतकऱ्यांना आल्यामुळे घरातील ओला सुका कचरा फेकून न देता सेंद्रिय खत निर्मिती करण्यासाठी ग्रामस्थांच सहभाग वाढत आहे.

कचरामुक्त ग्राम परिवर्तनाची ही सगळी किमया वाई रोटरी क्लब परिवार व प्रांतपाल मा. स्वाती हेरकळ तसेच मेणवली विकास सेवा सोसायटीचे चेअरमन मधुकर चौधरी व संचालक मंडळामुळे साध्य करता आली असे मेणवली ग्रामस्थ अभिमानाने सांगत आहेत.

# तुकाराम बीजेनिमित्त तुकोबांच्या वेशात अभिनव मतदान जनजागृती!

**राजदंड / कोरेगाव**



तुकाराम बीजेचे औचित्य साधून येथील सरस्वती विद्यालयात विद्यार्थी आणि शिक्षकांशी संवाद साधून अभिनव पद्धतीने प्रबोधन आणि मतदान जनजागृती करण्यात आली.

यावेळी संत तुकारामांच्या वेशात स्वीप उपक्रमाच्या पथकाचे प्रमुख यशेंद्र क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले. तसेच जनजागृती पथकाचे नोडल अधिकारी सुजितकुमार इंगवले, मुख्याध्यापक आर. बी. बर्गे आणि शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संत तुकारामांच्या विविध अभंगांच्या माध्यमातून तसेच संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद केले.''सत्य असत्याशी मन केले ग्वाही! मानियले नाही बहुमता'' असे तुकाराम महाराज यांनी म्हटले आहे. आपल्याला जे योग्य वाटते आहे, त्या पद्धतीने सत्य लक्षात घेऊन जास्तीत जास्त मतदान होणे गरजेचे आहे. ''असाध्य ते साध्य, करिता सायास! कारण अभ्यास तुका म्हणे!'' या अभंगातून संत तुकारामांनी अभ्यासाचे महत्त्व सांगितले आहे. अशा अनेक अभंगांची उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना अभ्यासाचे आणि त्यासोबत मतदान आणि लोकशाहीचे महत्त्व सांगण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचंड कष्टातून राज्यघटनेची निर्मिती केली. समता, बंधुता, स्त्री पुरुष समानता, पर्यावरणप्रेम, सामाजिक न्याय अशा मूल्यांची पेरणी केली. या राज्यघटनेचे महत्त्व अबाधित राखण्यासाठी जास्तीत जास्त मतदान होणे गरजेचे आहे. कमी मतदानाने नेतृत्व निवडणे म्हणजे लोकशाहीला कमी महत्त्व देण्यासारखे आहे. संत साहित्यातील विविध प्रेरक प्रसंग यावेळी विद्यार्थ्यांना सांगून अभ्यासाचे, करिअरचे आणि त्यासोबतच लोकशाही आणि मतदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. आपल्या पालकांना मतदान करण्यासाठी आग्रह करा, असे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

श्री. इंगवले यांनी मतदान आणि लोकशाहीचे एकंदरीत देशाच्या प्रणालीतील महत्त्व विशद केले.

# प्रा. लावंड यांच्या 'गुराखी' कथासंग्रहाचे प्रकाशन सोहळा संपन्न




**राजदंड / वाई**

ज्ञानदीप इंग्लिश मिडीयम स्कूलमथील प्रा. संभाजी लावंड यांच्या 'गुराखी' या ग्रामीण कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा मोठ्या दिमाखात व उत्साही वातावरणात पार पडला.

प्रमुख पाहुणे साहित्यिक व ज्येष्ठ समीक्षक प्रा डॉ रघुनाथ केंगार यांचे हस्ते व प्रा डॉ पंडीतराव टापरे यांच्या अध्यक्षतेखाली ,विद्यावर्धिनी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी उपाध्यक्ष दत्ता मर्ढेकर, माजी सचिव प्रा दत्तात्रय वाघचौरे, सचिव राहुल जगदाळे यांचे उपस्थितीत पार पडला. खातगुण येथील कवी व साहित्यिक श्री अरविंद यादव यांनी उपस्थित राहून गावच्या स्मृतींना चांगलाच उजाळा दिला.तर डॉ स्वप्नील तौर यांनी गुराखी पुस्तकाचे कौतुक केले. सदर कार्यक्रमाचे सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले नंतर मान्यवरांचा सत्कार करणेत आला. संस्थेच्या वतीने लेखक लावंड परिवाराचे शाल श्रीफल देवुन उचित सन्मान करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते गुराखी या पुस्तकांचे प्रकाशन करणेत आले. प्राचार्या शुभांगी पवार म्हणाल्या वाचन चिंतनाचे व्यक्तीला लेखन कला प्राप्त होते. या लेखनास पुरक असे वातावरण व निसर्गाचे वरदान ज्ञानदीपला लाभले आहे. याचा फायदा सर्वांनी घ्यावा. प्रा. डॉ. रघुनाथ केंगार सरांनी 'गुराखी' या पुस्तकाचे अंतर्बाह्य परीक्षण करुन लेखक व त्यांची चिंतनशीलता किती प्रभावी असू शकते याचा प्रत्यय म्हणजे गुराखी कथासंग्रह आहे. असे गौर वोद्गार काढले. तर डॉ.पंडित टापरे सरांनी आपल्या भाषणातून गुराखी या पुस्तकातील बलस्थाने व भाषा शैलीचा मागोवा घेतला., या प्रसंगी सौ एकता लावंड, शिक्षिका सौ. लता जाधव ,सौ सरस्वती वाशिवले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रा. पोपटराव काटकर यांनी सुत्रसंचलन व आभार मानले. कार्यक्रमाला संजय डेरे,दत्ता महागडे,मयुर एरंडे, खातगुण गावचे मान्यवर ग्रामस्थ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# 'ड्रींक अ‍ॅण्ड ड्राईव्ह'प्रकरणी युवकावर गुन्हा

**राजदंड / सातारा**

मद्यप्राशन करत दुचाकी चालवल्या प्रकरणी एका युवकावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

प्रथमेश विजयकुमार पुणेकर (वय २३, रा. सोमवार पेठ, सातारा) हा मद्य पिवून दुचाकी (अ‍ॅक्टिव्हा, एमएच ११ सीआर ०८७७) दुचाकी चालवताना आढळून आला.

त्याच्या विरोधात पोलीस हवालदार सुरज रेळेकर यांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस हवालदार टकले तपास करत आहेत.

# सर्वंकष क्रांती शहीद वीरांनी केली - कॉ. किरण माने

**राजदंड / सातारा**




स्वातंत्र्य मिळविणे हा एकमेव उद्देश्य नव्हता.रशियात लेनिनच्या नेतृत्वाखाली ज्याप्रकारची क्रांती झाली होती. त्याच धर्तीवर युवकांना जागे करण्यासाठी शहीद वीरांनी काम केले होते.काळे कायद्याच्या निषेधार्थ भगतसिंग यांनी आसेम्बलीत बॉम्ब टाकून धमाका उडावला होता.असे विचार कॉ. किरण माने यांनी व्यक्त केले.


येथील शहीद चौकात अमर हुतात्मा भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.तेव्हा कॉ. माने मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी कविवर्य विनायक आफळे होते.यावेळी शाहूपुरी पोलीस स्टेशनतर्फेही अभिवादन करण्यात आले.

कॉ. किरण माने म्हणाले, ''तरुणांना जागृत करण्यासाठीच शहिदांनी बॉम्ब टाकला होता. इंग्रजानी आदल्या दिवशीच मध्यरात्री शहीदवीरांना फाशी दिले होते. हसतहसत देशासाठी व हजारो युवकांना प्रेरणादायी ठरलेल्या घटनेची नोंद झाली आहे.सामाजीक समतेचा संदेश भगतसिंग यांनी दिलेला आहे. विषमता व धार्मिकता नष्ट करण्यासाठीच सामाजिक कार्य शहीद वीरांनी हाती घेतले होते.भगतसिंग नास्तिक होते. यावर नास्तिकतेबद्धल विचारलेल्या प्रश्नांस भगतसिंग यांनी पत्राद्वारे समर्पक उत्तर दिले होते.सर्वच प्रकारची विषमता नष्ट करण्यासाठीच त्यांनी अखेरपर्यंत कार्य केले.''चौकात भगतसिंग, राजगुरू व सुखदेव या शहीद वीरांचे एकत्रीत पुतळा उभारण्यासाठी कायदेशीर प्रयत्न करण्याबाबत कॉ. माने, आफळे व अनिल वीर यांनी चर्चा केली.

प्रथमतः शहीद वीर यांच्या नामफलकाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कॉ. माने व मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.परवेज सय्यद यांनी प्रास्ताविक केले.कॉ.दत्ताराव राऊत यांनी आभारप्रदर्शन केले. सिद्धेश्वर कुरोली या गावात आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली रात्री भगतसिंग यांच्या जीवनावर चित्रपट दाखविण्यात आला. सदरच्या कार्यक्रमास डॉ.दीपक माने, प्रकाश खटावकर, भगवान रणदिवे, जगमोहनसिंग व हरभजनसिंग भाटिया, मनोज चाकणकर, भगवान अवघडे, सलीम आतार, गौतम भोसले, विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या.

# इंटरनेट केबलमुळे महापारेषणच्या 'टॉवर लाईन'मध्ये बिघाड

## पुणे शहरात काही ठिकाणी तासभर वीजपुरवठा विस्कळीत



**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

धायरीमधील आनंदविहार येथे महापारेषणच्या २२० केव्ही अतिउच्चदाब वीजवाहिनीला गुरूवारी (दि. २८) दुपारी १.५३ वाजता इंटरनेट केबलचा स्पर्श झाल्याने नांदेड सिटी २२० केव्ही उपकेंद्रातील ५० एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मरचा वीजपुरवठा खंडित झाला. त्यामुळे विजेची तूट भरून काढण्यासाठी महापारेषणची स्वयंचलित भारव्यवस्थापन यंत्रणा (डेरव ढअ‍ॅाळपस डलहशाश- ड्ढड) कार्यान्वित झाली. परिणामी पुणे शहरातील वडगाव धायरी, नऱ्हे, हिंगणे, कोथरूड, जुनी सांगवी, पद्मावती, धनकवडी, कात्रज, आंबेगाव आदी परिसरातील सुमारे ३ लाख ९ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा तासभर खंडित झाला होता.

आनंदविहार येथे इंटरनेट केबल टाकण्याच्या प्रयत्न सुरु होता. त्याच ठिकाणी असलेल्या महापारेषणच्या २२० केव्ही अतिउच्चदाब वीजवाहिनीला आज दुपारी १.५३ वाजता या इंटरनेट केबलचा स्पर्श झाला. त्यामुळे मोठा आवाज होऊन वीजवाहिनीद्वारे होणारा नांदेड सिटी २२० केव्ही उपकेंद्रातील ५० एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरचा वीजपुरवठा खंडित झाला. यात सुमारे ६० मेगावॅट विजेची तूट निर्माण झाल्यामुळे भारव्यवस्थापनासाठी महापारेषणची स्वयंचलित एलटीएस (डेरव ढअ‍ॅाळपस डलहशाश) यंत्रणा कार्यान्वित झाली. त्यामुळे पर्वती २२० केव्ही, नांदेड सिटी २२० केव्ही, कोंढवा (येवलेवाडी) २२० केव्ही तसेच कोथरूड १३२ केव्ही व एनसीएल १३२ केव्ही या अतिउच्चदाब उपकेंद्रातून भारव्यवस्थापन करण्यात आले.

महापारेषणच्या या पाचही अतिउच्चदाबाच्या उपकेंद्रांतील भारव्यवस्थापनामुळे महावितरणच्या विविध उपकेंद्रांना होणारा वीजपुरवठा बंद पडला. परिणामी वडगाव, धायरी, नऱ्हे, किरकीटवाडी, सिंहगड रस्ता, सनसिटी रस्ता, हिंगणे, पद्मावती, मार्केटयार्ड, कात्रज, आंबेगाव, धनकवडी, जुनी सांगवी, शितोळेनगर, आनंदनगर, एरंडवणे, डहाणूकर कॉलनी या परिसरातील सुमारे ३ लाख ९ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा दुपारी १.५३ खंडित झाला. महापारेषणच्या अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी तातडीने आनंदविहार येथे जाऊन अतिउच्चदाब वीजवाहिनीतील बिघाड दुरूस्त केला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व परिसरातील वीजपुरवठा दुपारी २.५६ वाजेपर्यंत पूर्ववत करण्यात आला.

# खंडणी मागत धक्काबुक्की; एकावर गुन्हा दाखल

**राजदंड / सातारा**

'तुझा फळांचा गाडा या ठिकाणी लावायचा नाही. हा इलाका माझा आहे. तुला गाडा लावायचा असेल तर तुला दिवसाला मला ५०० रुपये द्यावे लागतील,' अशी धमकी देत खंडणी मागत, धक्काबुक्की केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सदरबझारमधील शिंदेशाही हॉटेल समोरील रस्त्यावर दि. २१ मार्च रोजी सकाळी ११ वाजता हा प्रकार घडला.

फळविक्रेता युवराज सुरेश मुरारी (वय २१, रा. मंगळवार पेठ, सातारा) याने फिर्याद दिली असून, फिलीप भांबळ (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस नाईक सपकाळ तपास करत आहेत.

# पिंपोडे बुद्रुकमध्ये चारा छावणी सुरू करा!

## शेतकरी वर्गाची मागणी

**राजदंड / कोरेगाव**

सध्या उत्तर कोरेगाव तालुकामध्ये पिण्याच्या पाण्या सहचारा प्रश्न ऐरणीवरआला असून शासनाने पिंपोडे बुद्रुक नांदवळ या ठिकाणी जनावरासाठी चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात अशी अग्रगण्य मागणी उत्तर कोरेगाव तालुक्यातील शेतकरी वर्ग करीत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की उत्तर कोरगाव तालुका हा सन १९७२ पासून पिण्याच्या पाण्यासाठी शेतीच्या पाण्यासाठी व जनावरांच्या चारा पाण्यासाठी शेतकरी वर्ग हा नेताकुटीला आला आहे मात्र उत्तर भागातील नांदवळ धरणाने तळगाटला आहे विहिरी ओढून आले वाचना नदी पूर्णपणे आटली आहे त्यामुळे उत्तर कोरेगाव तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला दुष्काळी परिस्थितीशी सामना करावा लागत आहे पिपोडे बु बुद्रुक सारख्या गावाला आठवड्या मधून एक दोन वेळा च पाण्याचा टँकर येत आहे अशा परिस्थितीमध्ये



आम जनता व शेतकऱ्यांनी काय करायचं हा एक प्रश्नच आहे नुकताच त्यांचाही आढावा बैठकीमध्ये फलटण कोरेगाव विधानसभेचे आमदार दीपक चव्हाण यांनी उत्तर कोरेगाव तालुक्यामध्ये पाण्याचे टँकर वाढवण्याची मागणी केली परंतु आज अखेर वाढीव टँकरही आला नाही जो एक टँकर येत आहे तो सुद्धा रामभरोशी असल्याचे वास्तव चित्र आम जनतेला पाहावयास मिळत आहे.

# रनाहोलीक्स ग्रुपला सर्वोत्कृष्ट मानाचा 'रनिंग पुरस्कार'



**राजदंड / हडपसर**

पुणे येथील रनोहोलिक्स ग्रुपला सर्वोत्कृष्ट मानाचा रनिंग पुरस्कार मिळाला.

१७ मार्च २०२४ रोजी मुंबई रोड रनर्स मुंबईतील विख्यात रनिंग संबंधित संस्थेतर्फे मानाचा सर्वोउत्कृष्ट रनिंग क्लब हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रनोहोलिक्स ग्रुप हा सातत्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मॅराथॉन तसेच आयर्नमॅन स्पर्धांमध्ये सहभागी होत असते. डॉ. योगेश सातव यांच्या मार्गदर्शनाखाली बनविलेल्या ट्रेनिंग प्लान्स नुसार नियमित सराव करण्यात येतो. विविध स्पर्धांमध्ये पहील्या ३ स्पर्धकांमध्ये रनोहोलिक्स चे सदस्य नियमितपणे दिसुन येतात. नुकत्याच झालेल्या टाटा मुंबई मॅराथॉन व टाटा अल्ट्रा मॅराथॉन मध्ये मोठ्या संख्येने रनोहोलिक्स ग्रुपचे सदस्य सहभागी झाले होते. तसेच दक्षिण आफ्रिकेतील ९० किमी अंतराची कॉमरेड्स अल्ट्रा मॅराथॉन मध्ये सहभागी होऊन रनोहोलिक्स सदस्यांनी यशस्वीरीत्या स्पर्धा पूर्ण केली आहे. दररोजच्या धकाधकीच्या जीवनात स्वतःचे आरोग्य जपण्याचा वसा रनोहोलिक्स ग्रुपने घेतला आहे. जवळपास ३५० सदस्य धावण्याच्या नियमित सराव करत आहेत. मुंबई रोड रनर्स संस्थेने दिलेल्या पुरस्काराने ग्रुपच्या कार्याची योग्य दखल घेण्यात आली असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. सुदृढ आरोग्य मिळविण्यासाठी सुरु असलेला यज्ञ अविरत असाच पुढे सुरु राहिल आणि त्या प्रवासात दिवसेंदिवस असे अनेक पुरस्कार प्राप्त होतील अशी जनमानसात भावना आहे.

रनोहोलिक्स ग्रुपचे मुख्य मार्गदर्शक व कोच डॉ योगेश सातव यांना मुंबई रोड रनर्स आवार्ड मध्ये सर्वोत्तम कोच म्हणून नामांकन पण मिळाले होते.

# शहरांमधील मोकळ्या जागांच्या संरक्षणावर संशोधन

## आर्किटेक्ट आशिष केळकर यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित

**राजदंड / पुणे**

शहरांमधील मोकळ्या जागांच्या संरक्षणाबद्दल आर्किटेक्ट आशिष केळकर यांचे संशोधन 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ क्रिएटीव्ह रिसर्च थॉट्स' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.व्यवसायाने आर्किटेक्ट, अर्बन प्लॅनर असणाऱ्या आशिष केळकर यांनी 'युनिव्हर्सिटी ऑफ वेस्ट लंडन मधून कंट्री अँड टाऊन प्लानिंग' विषयात मास्टर्स डिग्री घेतली असून त्यांचे अनेक शोध निबंध आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध झाले आहेत. या क्षेत्रात कामाचा त्यांना २२ हून अधिक वर्षांचा अनुभव आहे.

'शहरातील अनियंत्रित वाढीमुळे शहरांमधील मोकळ्या जागा,पर्यावरण पाण्याची गुणवत्ता,हवा आणि सांडपाणी व्यवस्थापन धोक्यात आले असून तेथील मोकळ्या जागांच्या संरक्षणासाठी धोरणात्मक बदल केल्याशिवाय परिस्थिती सुधारणार नाही',असे ' इंटरनॅशनल जर्नल ऑफ क्रिएटीव्ह रिसर्च थॉट्स' मध्ये प्रकाशित संशोधनात आशीष केळकर यांनी म्हटले आहे.



'दर्जेदार मोकळ्या जागा ही शहरात चंगळ न राहता निकड बनली आहे.मेट्रो शहरांमधील विशेषत: मुंबईतील मोकळ्या जागांचे संरक्षण करण्यासाठी सध्याच्या धोरणात्मक साधनांना सक्षमीकरणाची नितांत गरज आहे.शहरातील नागरिक विशेषत: गरिबांच्या जीवनमानावर त्याचा परिणाम होत आहे',असे या शोधनिबंधात त्यांनी नमूद केले आहे.

'मोकळ्या जागेतील लोकांच्या सामाजिक संवादामुळे व्यवसाय वाढण्यास मदत होते आणि त्यामुळे शहरे वाढतात. तथापि,भारतीय शहरांमध्ये मनोरंजन आणि विश्रांतीच्या सध्याच्या कल्पनेत बदल झाला आहे.ही कल्पना इनडोअर स्पेसभोवती फिरते आणि त्यासाठी पैसे दिले जातात. दर्जेदार मोकळ्या जागा ही चंगळ (लक्झरी) बनली आहे. नितांत गरज आहे आणि विशेषत: गरिबांना त्रास देत आहे.मुंबईतील निम्म्याहून अधिक शहरी लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहत असल्याने,तेथे राहणाऱ्यांच्या जीवनमानावर मोकळ्या जागांच्या कमतरतेमुळे परिणाम होत आहे.

जमिनीच्या वापर(लँड युज) बदलल्याने आणि अनियंत्रित नागरी विस्तारामुळे पर्यावरण,घरांची उपलब्धता,पाणी गुणवत्ता,हवेचा दर्जा,कचरा व्यवस्थापन या परिणामझाला आहे.संशोधनानुसार,मुंबईतील हरित आच्छादन १९७३ मध्ये ५३.६३ टक्क्यांवर घसरले,२००९ मध्ये ३३.७६ टक्क्यांपर्यंत घसरले आहे.याचा अर्थ ६२ टक्के हरित आच्छादन आपण गमावले आहे.याच कालावधीत बिल्ट-अप एरिया १५५ टक्क्यांनी वाढला आहे.

'दरडोई शहरी मोकळी जागा सातत्याने कमी होत आहे. त्यामुळे सक्षम धोरण महत्त्वाचे आहे. मुंबईतील मोकळ्या जागांचे संरक्षण करताना साधनांना सक्षमीकरणाची गरज आहे. स्मार्ट शहरांबरोबर बरोबरच स्मार्ट व्हिलेजच्या विकासात व्यापक आणि अधिक मूलगामी धोरणांची गरज आहे. शहर पातळीवरील छोट्या सुधारणा धोरणांव्यतिरिक्त स्मार्ट व्हिलेजेस निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे.शहरांमधील पर्यावरणाचा ऱ्हास थांबवला पाहिजे.ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी आणि स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी ग्रामीण स्तरावर रोजगार निर्माण केला पाहिजे. स्वावलंबी खेड्यांची राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी कल्पना केली होती, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे',असे निष्कर्ष देखील आशीष केळकर यांनी मांडले आहेत.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात सांगली, कोल्हापूर, सोलापुरातून १३११ हरकती



**बुधगाव :** नागपूर ते गोवा या नियोजित शक्तिपीठमहामार्गाविरोधातस ांगलीजिल्ह्यातून ६११, कोल्हापूरमधून ४५० आणि सोलापूर जिल्ह्यातून सुमारे २५० अशा एकूण १३११ हरकती २८ मार्चअखेर शासनापुढे मांडण्यात आल्या आहेत. त्याची सुनावणी प्रक्रिया लवकरच सुरू होणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांनी सुनावणीवेळी आक्रमक भूमिका मांडावी असे आवाहनमहामार्गबाधितशेतकरीसंघर्ष समितीचे राज्य निमंत्रक दिगंबर कांबळे यांनी केले.

महामार्ग बाधित पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा मेळावा शुक्रवारी कवलापूर (ता. मिरज) येथे झाला. यावेळी समितीचे कांबळे म्हणाले, या मार्गाची कोणीही मागणी केलेली नसताना प्रक्रिया सुरु करणे अनाकलनीय आहे. माणसाच्या जगण्यासाठी संविधानिक तरतुदी आहेत, मारण्यासाठी नाहीत. या मार्गाने शेतकऱ्यांसह अनेक समाजघटक देशोधडीला लागणार आहेत. केवळ मूठभर लोकांचे हित त्यामागे लपले आहे. संघर्ष समितीने महामार्गबाधित शेतकऱ्यांच्या २२ मागण्या शासनापुढे ठेवल्या आहेत. त्या मान्य झाल्या, तरच शेतकरी संमती देतील.

कांबळे म्हणाले, हा लढा दीर्घकाळ अविरत चालणार आहे. शेतकऱ्यांची एकजुटच शासनाला नमवेल. महामार्गामुळे शेतकरी देशोधडीला लागणार आहे. सामाजिक सलोखाही तुटणार आहे. या मार्गामुळे फायद्यांपेक्षा तोटेच जास्त होणार आहेत. त्यामुळे तो रद्द करावा.

दरम्यान, सुनावणीदरम्यान शेतकऱ्यांचा एकसंधपणा दिसण्यासाठी कोणती भूमिका घ्यायची याचे मार्गदर्शन मेळाव्यात करण्यात आले. भूषण गुरव यांनी प्रास्ताविक केले. घनशाम नलावडे, राहुल जमदाडे, प्रवीण पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. शरद पवार यांनी आभार मानले.

शक्तिपीठ महामार्गबाधित शेतकऱ्यांच्या लढ्यात कवलापूरमधील शेतकऱ्यांनी सुरुवातीपासूनच महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हे लक्षात घेऊन या राज्यव्यापी लढ्याचे केंद्र कवलापूर येथेच राहील असा निर्णय झाला. घनशाम नलावडे (सांगली), सागर बिले (सोलापूर), दिलीप खोत (कोल्हापूर) यांच्या जिल्हा समन्वयकपदी निवडी करण्यात आल्या.

# सांगली जिल्हा बँकेच्या चौकशीवरून संचालकांचे राजीनामा नाट्य



**सांगली :** जिल्हा मध्यवर्तीबँकेतमागील संचालक मंडळाच्या काळात कलम ८३ अंतर्गत चौकशी समितीचा अहवाल सहकार विभागाकडे सादर झाला आहे. यापुढे आता कलम ८८ अंतर्गत चौकशी होऊन दोषींवर रक्कम निश्चिती व फौजदारी गुन्हे दाखल होऊन वसुली लागण्याची शक्यता आहे. या चौकशीवरूनबँकेच्यासंचाल कांमध्ये राजीनामा नाट्य रंगले आहे. बँकेतील संचालकांतील वादात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील लक्ष घालून समझोता घडविणार का? अशी चर्चा जिल्ह्यात रंगली आहे.

विद्यमान सरकारने स्थगिती उठवून चौकशी करण्याचे आदेश दिले. सदरचा चौकशी अहवाल सहकार आयुक्तांना सादर करण्यात आला. अहवालात बांधकाम, एटीएम मशीन व नोटा मोजणी मशीन खरेदी, फर्निचर यामध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत. या कामावर चार कोटी ४० लाख ९० हजार ७५४ रुपये खर्च करणे बँकेसाठी निश्चितच योग्य नाही. बँकेच्या निधीची सरळसरळ उधळपट्टी असल्याचे ताशेरे अहवालात ओढण्यात आले आहेत.केन ग्रो, वसंतदादा, महाकाली व स्वप्नपूर्ती साखर कारखान्याचा कर्जपुरवठा, २१ तांत्रिक पदांची भरती, ४०० कनिष्ठ लिपिक पदाची भरती, यशवंत कारखाना विक्री व्यवहार, डिव्हाइन फूडला दिलेले कर्ज, सरफेसी क्टप्रमाणे सहा सहकारी संस्थांचा खरेदी व्यवहार, बाबासाहेब देशमुख सूतगिरणी विक्री, खानापूर तालुका सूतगिरणी विस्तारीकरण, गोपूज साखर कारखान्यास कर्जवाटप, एका संचालकाच्या पेट्रोलपंपास दिलेले कर्ज यासह तक्रारीत करण्यात आलेल्या अन्य मुद्यांची चौकशी अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी केली आहे.

यात सर्वच प्रकारणात मोठ्या प्रमाणात अनियमितता, नियमबाह्य-कमी तारण कर्जवाटप, चुकीची प्रक्रिया आदी दोष आढळले. या चौकशीचा अहवाल ५ मार्च २०२४ रोजी विभागीय सहनिबंधकांकडे सादर झाला आहे. जिल्हा बँकेची चौकशी सुरू असतानाच एका संचालकाच्या राजीनामा नाट्याची चर्चा जिल्ह्यात सर्वत्र रंगली आहे. या संचालकाची काही नेत्यांनी समजूत काढून वादावर पडदा पडल्याचीही चर्चा आहे. तसेच बँकेतील दोन आजी-माजी पदाधिकाऱ्यांतील संघर्ष मिटविण्यात जयंत पाटील मध्यस्ती करणार की नाही, अशीही चर्चा सुरू आहे.कुणीही राजीनामा दिलेला नाही : मानसिंगराव नाईक

जिल्हा बँकेत व्यवस्थित कारभार सुरू आहे. बँकेत स्वच्छ आणि पारदर्शी कारभार सुरू आहे. यामुळे शासनाकडून होणाऱ्या कोणत्याही चौकशीस सामोरे जाण्यास बँकेचे प्रशासन आणि संचालक तयार आहेत. बँकेच्या एकाही संचालकाने राजीनामा दिला नाही आणि त्याची माझ्यापर्यंत कोणतीही तक्रारीही आली नाही, अशी प्रतिक्रिया जिल्हा बँकेचे अध्यक्ष व शिराळ्याचे आमदार मानसिंगराव नाईक यांनी दिली.

जिल्हा बँकेने कर्जपुरवठ्यासह बँकेच्या विस्तरासाठीचा खर्च सर्व संचालकांच्या सहमतीने कायदेशीर मार्गानेच केला आहे. कुठेही खर्चामध्ये अनियमितता नाही; पण बँकेचे काही अधिकारी जाणीवपूर्वक माझ्याविरोधात भूमिका घेत आहेत. म्हणूनच 'त्या' संचालकाने राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा गुरुवारी सभासद व संचालकांमध्ये रंगली होती.

# मुरूम उखनन कर्नाटकात नियमबाह्य विक्री महाराष्ट्र राज्यात

### महसूल विभागाने कडक कारवाई करावी

कुरुंदवाड : मुरूम उत्खनन कर्नाटक हद्दीत बेकायदेशीर विक्री महाराष्ट्राच्या हद्दीत वारे माप दराने शिरोळ तालुक्यात बेकायदेशीर मुरूम वाहतूक सुरू असल्याने राज्य शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडत चालला असून कर्नाटकातून मुरूम महाराष्ट्रात आणणाऱ्या गाड्यांवरती कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी या परिसरातील नागरिक करत आहेत

शिरोळ तालुक्यांमध्ये अनेक प्रकारच्या गौण खनिजांना उखनन करण्यास हरित लवादाने बंदी घातली आहे याचा फायदा घेत कर्नाटक राज्यातील मुरूम माफिया तेथील तहसीलदार कार्यालयाला नाममात्र महसूल भरून इतर राज्यांमध्ये विशेष करून महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत सरासपणे बेकायदेशीरपणे विक्री करत आहेत एक प्रकारे महाराष्ट्र शासनाला आव्हान दिले जात असल्याची चर्चा सुरू आहे यांच्याकडे एटीपी सारखा परवाना काढलेले दिसत नाही तसेच शिरोळ तालुका महसूल विभागाकडून रायल्टी भरून रीतसर परवाना घेतला की नाही हे देखील समजून येत नाही वाहतूक परवा नाही नसतो यासारखे महाराष्ट्र शासनाचे सर्वच नियम धाब्यापासून बेधडकपणे महाराष्ट्र राज्यात सरास विक्री सुरू आहे सर्वकाही दाबून देतो ऐसा जे करून शेकडो मुरुमांच्या गाड्यांची सर्रास विक्री करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवत आहेत याला जबाबदार कोण

कोणत्याही गौण खनिज मालाची विक्री एका राज्यातून दुसऱ्या राज्यात करावयाची असते अशा वेळेस त्यांना एटीपी वाहतूक परवाना सारखी परवानगी घ्यावी लागते शिवाय वाहन परवानाही लागतो ते निराळेच अशा कोणत्याच कायदेशीर बाबीची पूर्तता न करता शेकडो मुरमाचे ट्रक महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील विशेष करून शिरोळ तालुक्यात दाम दुप्पट दराने विक्री करत आहेत याला तातडीने महसूल विभागाने आळा घालावा अशी मागणी महसूल व शासकीय कर भरणाऱ्या शिरोळ तालुक्यातील जनतेतून होत आहे.

# निलेश लंके यांचा आमदारकीचा राजीनामा, अहमदनगरमधून लोकसभा लढवणार



**अहमदनगर :** पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार निलेश लंके यांनी अखेर आमदारकीचा राजीनामा दिला आहे. विधानसभा अध्यक्षांना आपण आजच राजीनामा पाठवत असूनशरद पवारयांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढविणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.- ऊत्तएठढखडएचएछ्ढलंके यांनी शुक्रवारी सायंकाळी सुपा येथे कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला संबोधताना त्यांनी विखे पाटील यांच्यावर कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष टीका केली. विखे यांनी आपल्यावरील रागापोटी पारनेरची सर्व कामे अडवली. त्यांनी मतदारसंघात दहशत निर्माण केली आहे. या दहशतीला पायबंद घालण्यासाठी आपण मैदानात उतरलो असल्याचे लंके म्हणाले.

राजीनाम्याची घोषणा करण्यापूर्वी लंके यांना रडू कोसळले. जनतेने आपणाला निवडून दिले. पण ही लढाई लढण्यासाठी मुदतपूर्व राजीनामा देण्याची वेळ आली. आपणशरद पवारांनालोकसभा लढविण्याचा शब्द दिला होता. मधल्या वाईट काळात शरद पवारांना साथ देऊ शकलो नाही याचे दुःख आहे. ती भरपाई करण्यासाठी आपण राजीनामा देत आहोत. मुंबईत हा राजीनामा अध्यक्षांना आजच पोहोच होईल. तसेच मेलवरही पाठवत आहोत, असे त्यांनी सांगितले.

### बच्चू कडूंचा महायुतीला 'दे धक्का'

**अमरावती :** महायुतीचे घटक पक्ष असलेल्या प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदारबच्चू कडूयांनी खासदार नवनीत राणांचा प्रचार करणार नाही. प्रहार पक्षाच्या कार्यकर्त्यांची तशी भावना आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वस्तुस्थिती सांगितली आहे. प्रसंगी महायुतीतून बाहेर पडू पण राणांसाठी मत मागणार नाही, अशी रोखठोक भूमिका गत काही दिवसांपूर्वीबच्चू कडूयांनी मांडली होती. अखेर शुक्रवारी महायुतीला धक्का देत प्रहार पक्षाकडून दिनेश बुब यांना उमेदवारी जाहीर केल्यामुळे महायुतीतील विसंवाद चव्हाट्यावर आला आहे.

### राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेत वेदांत गावडे यांने मिळवले रौप्यपदक



**शिरोळ :** रत्नागिरी जिल्ह्यातील डेरवण (ता चिपळूण) येथील विठ्ठलराव जोशी क्रीडा संकुल येथे झालेल्या राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धेत श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना संचलित दत्ताजीराव कदम कामगार कल्याण मंडळाचा खेळाडू वेदांत अनिल गावडे याने रौप्यपदक पटकाविले

राज्यस्तरीय मल्लखांब स्पर्धा चूरशीने पार पडल्या या स्पर्धेत वेदांत अनिल गावडे याने द्वितीय क्रमांक मिळवला तसेच सांघिक स्पर्धेत वेदांत गावडे श्रेयश देबाजे यांनी तृतीय क्रमांक मिळवला

या सर्व यशस्वी खेळाडूंना श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सहकारमहर्षी गणपतराव पाटील श्री दत्ताजीराव कदम कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष एम व्ही पाटील सचिव निलेश पाटील

# पाणीटंचाई निवारणासाठी ३७ गावांत ४० विंधन विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता



**अकोला :** जिल्हयातील अकोट,अकोलाव बार्शिटाकळी या तीन तालुक्यांतील ३७ गावांत पाणीटंचाइ निवारणासाठी ४३ लाख ३९ हजार रुपये अंदाजपत्रकीय किमतीच्या ४० विंधन विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत असल्याचा आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी २२ मार्च रोजी दिला. त्यामुळे संबंधित गावांतील पाणीटंचाइ निवारणाच्या कामांचा मार्ग मोकळा झाला आहे.तापत्या उन्हासोबतच जिल्हयातील विविध भागात पाणीटंचाइची समस्या जाणवू लागली असून, पिण्याच्या पाण्यासाठी टंचाइग्रस्त गावांत ग्रामस्थांना पायपीट करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हयातील पाणीटंचाइ निवारणासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांच्या कृती आराखड्यास जिल्हाधिकाऱ्यांकडून दोन महिन्यांपूर्वी मंजूरी देण्यात आली आहे. आराखड्यात समाविष्ट उपाययोजनांच्या कामांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशासकीय मान्यता दिली जात आहे. त्यानुसार जिल्हयातील अकोट, अकोला व बार्शिटाकळी या तीन तालुक्यातील ३७ गावांत ४० विंधन विहिरींच्या कामांचा प्रस्ताव जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने संबंधित गावांमध्ये पाणीटंचाइ निवारणासाठी ४० विंधन विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत असल्याचा आदेश जिल्हाधिकारी कुंभार यांनी दिला.

| तालुका | गावे | विंधन विहिरी |
|---|---|---|
| अकोला | २२ | २४ |
| अकोट | ०५ | ०५ |
| बार्शिटाकळी | १० | ११ |

प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली संबंधित ३७ गावांतील ४० विंधन विहिरींची कामे येत्या १५ एप्रिलपर्यंत किंवा त्यापूर्वी पूर्ण करुन, त्याव्दारे प्रत्यक्ष पाणीपुरवठा सरु करण्याचे सांगत ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाइ भासणार नाही, याकडे लक्ष देण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी कुंभार यांनी जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागासह संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

# बनावट व खोटा झोन दाखला जोडून बिनशेती परवाना घेऊन फसवणूक

राजदंड न्युज नेटवर्क

पन्हाळा : पन्हाळा उपविभागीय अधिकारी पन्हाळा व तहसिदार कार्यालय पन्हाळा कार्यालयातून बनावट व खोटा झोन दाखला जोडून बिनशेती परवाने घेऊन श्रीमती रुपाली श्रीरंग चौगुले व उदय मधुकर भोपळे यांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.याबाबत उपविभागीय अधिकारी (प्रांत) कार्यालय, व तहसिदार कार्यालय पन्हाळा यांचे कडून कोडोली पोलिसात निवास पांडुरंग जाधव रा. काखें ता. पन्हाळा याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणामुळे पन्हाळा तालुक्यात बोगस सही, शिक्क्याचे दाखले व खोटे दाखले तयार करणारी टोळी कार्यरत असल्याची शक्यता गडद झाली आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी, पन्हाळा तहसील कार्यालय व कोडोली पोलिसातून मिळालेली माहिती अशी, कोडोली पोलीस व उपविभागीय कार्यालया कडून बोगस सही शिक्का प्रकरणी तपास चालू आहे. या तपासात २०२२सलाचे नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात श्रीमती रुपाली श्रीरंग चौगुले यांना कोडोली येथील गट नं.४०५ मधील जमिनीचा वाणिज्य कारणासाठी बिनशेती परवाना.तर उदय मधुकर भोपळे यांना दानेवाडी येथील गट नं.७८,७९ मधील क्षेत्राकरीता निवासी कारणासाठी दिलेले बिनशेती परवाने संशयस्पद आढळले. सदर दोन्ही परवाने उपविभागीय अधिकारी कार्यालय व पन्हाळा तहसील कार्यालयातून घेतले होते. त्याचे तपासासाठी पोलिसांनी चौगले व भोपळे यांचे कडे चौकशी केली.तेव्हा त्यांनी ते परवाने संशयित आरोपी निवास जाधव याने २ लाख २५ हजार रुपये घेऊन व १ लाख २५ हजार रुपये देणेचे ठरवून दिलेचे सांगितले. या माहिती आधारे तपास केला असता जाधव याने हे बिनशेती आदेश मिळवण्यासाठी बनावट व खोटा झोन दाखला प्रकरणी जोडला असलेचे निष्पन्न झाले आहे.त्यामुळे तहसील कार्यालया कडून प्राधिकृत केलेल्या अभिजीत नारायण पवार मंडळ अधिकारी कोडोली यांनी, कोडोली पोलिसात निवास जाधव याच्यावर बनावट व खोटा झोन दाखला जोडून बिगरशेती परवाना घेऊन उपविभागीय अधिकारी,तहसीलदार पन्हाळा, याचेसह शासनाची फसवणूक तसेच चौगले व भोपळे यांचे कडून पैसे घेऊन आर्थिक फसवणूक केले बाबत गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यात कोडोली पोलिसांनी तात्काळ निवास जाधव यास अटक केली. .पुढील तपास कोडोली पोलिस ठाण्याचे सहायक पालिस निरिक्षक एन.बी. दांडगे करीत आहेत.

संशयित आरोपी निवास पांडुरंग जाधव हा सत्तेतील सर्वात मोठ्या असलेल्या पक्षाचा तालुका व जिल्हा कार्यकरणीत पदाधिकारी आहे.

# पुणे-बंगळूरु राष्ट्रीय महामार्ग

## टोप येथे उड्डाणपूलाचे काम सुरू, ग्रामस्थांची मागणी अखेर पुर्ण



**शिरोली :** टोप येथील ३५० मिटरच्या उड्डाणपूलाचे काम सुरू झाले असून. १२ पिलरवर हा उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. सध्या मुख्यमहामार्गावरीलवाहतूक दोन्ही सेवा मार्गावरुन वळवली आहे.

पुणे बंगळूर राष्ट्रीयमहामार्गाचेसध्या सहा पदरीचे काम सुरू आहे. टोप येथे ३५० मिटरचे जायला आणि यायला असे दोन उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. या ठिकाणी रोडवेज इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे.

टोप हा अपघाताचा ब्लॅक स्पॉट म्हणून ओळखला जातो. दोन्ही बाजूला उतार आणि दोन्ही बाजूला वळणाचा रस्ता असल्याने तसेच रहदारी, महामार्गा लगत नागरी वस्ती, शाळा, गावगाडा चालणारी ग्रामपंचायत, मुख्यतः जोतिबा डोंगरावर जाणारा मार्ग, दोन्ही बाजूला हॉटेल, धाबे, आठवडी बाजार, क्रशर आणि दगड खाण व्यवसाय , उद्योग कारखाने याठिकाणी असल्याने हा टोप फाटा कायमच गजबजलेला असतो. महामार्गा मुळे टोप गावचे झालेले पूर्व पश्चिम विभाजन त्यामुळे या ठिकाणी सतत अपघात होतात.

टोप येथे जेव्हा महामार्गाचे चौपदरीकरण सुरू होते तेंव्हाच हा उड्डाणपूल होणे गरजेचे होते. सन २००२ ते २००६ या काळात टोप ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी या ठिकाणी उड्डाणपूलाची मागणी उचलून धरली होती. पण सहापदरी रस्ता होणार त्यावेळी आपण उड्डाणपूल करु असे आश्वासन दिले होते. पण गेल्या २० वर्षात याठिकाणी अनेक अपघात होवून कित्येकांचे प्राण गेले. अनेकजण जायबंद झाले.

पण सध्या सहापदरीकरण सुरू आहे. आणि टोप बाजार कट्टा ते बिरदेव मंदिर पर्यंत असा ३५० मिटरचे दोन उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. हे उड्डाणपूल पिलर वरती उभारण्यात येणार असून त्यासाठी एकूण १२ पिलर उभारले जाणार आहेत. तसेच स्थानिक लोकांसाठी सेवामार्ग आणि जोतिबा डोंगरावर , कासारवाडी, सादळे मादळे, पन्हाळा जाण्यासाठी या उड्डाणपूला खालून रस्ता देण्यात येणार आहे. या उड्डाणपूलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट रोडवेज कंपनीचे आहे. या उड्डाणपूला मुळे टोप गावचा मोठा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न सुटणार आहे.

टोपमध्ये उड्डाणपूल झाले पाहिजे यासाठी पहिल्या पासून आमची मागणी होती. सध्या उड्डाणपूलाचे काम सुरू झाले आहे. टोप चा मोठा प्रश्न मार्गी लागला आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. टोप येथील उड्डाणपूलाच्या कामाला सुरुवात झाली असून महामार्गावरील वाहतूक दोन्ही सेवा मार्गावर वळवली आहे. उड्डाणपूल लवकर पूर्ण करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. तो पर्यंत वाहनधारकांनी वाहने सावकाश चालवावीत.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# सलग २ सामने गमावणाऱ्या हार्दिक पांड्यासाठी आणखी एक वाईट बातमी, मुंबई इंडियन्सलाही बसणार फटका



आयपीएलचे पाचवेळा जेतेपद पटकावणाऱ्या मुंबई इंडियन्ससाठी सतराव्या हंगामाची सुरुवात फारशी समाधानकराक झालेली नाही. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या मुंबई इंडियन्सला सलग दोन पराभवाला सामोरे जावे लागले. पहिल्या सामन्यात शुभमन गिलच्या गुजरात टायटन्सने मुंबईवर मात केली. तर दुसऱ्या सामन्यात पॅट कमिन्सच्या सनरायजर्स हैदराबादने अतिशय वाईट पद्धतीने मुंबई इंडियन्सला धुळ चारली. सलग दोन पराभवामुळे आयपीएल पॉईंटटेबलमध्ये मुंबई इंडियन्स नवव्या क्रमांकावर आहे. हे कमी की काय मुंबई इंडियन्ससाठी आता आणखी एक वाईट बातमी समोर आली आहे.

मुंबई इंडियन्सला बसणार फटका

मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव पुढचे आणखी काही सामने खेळू शकणार नाही. टी२० स्पेशलिस्ट असलेल्या सुर्यकुमार यादवची काही दिवसांपूर्वी स्पोर्ट्स हार्नियां सर्जरी झाली होती. यातून तो अद्याप पूर्णपणे बरा झालेला नाही. फिटनेस टेस्टमध्येही सूर्यकुमार यादव पास होऊ शकला नव्हता. त्यामुळे एनसीएने सूर्यकुमार यादवला खेळण्याची परवानगी दिलेली नाही. पहिल्या दोन सामन्यात सुर्या खेळू शकला नव्हता. पण आता पुढच्या आणखी काही सामन्यातही त्याला खेळता येणार नाहीए. मुंबई इंडियन्समध्ये पुनरागमन करण्यासाठी सूर्याला आणखी काही काळ लागणार आहे.

फिट नसतानाही सूर्यकुमारला आयपीएलमध्ये खेळवण्याचा धोका बीसीसीआयला घ्यायचा नाहीए. कारण आयपीएल संपल्यानंतर लगेचच म्हणजे जून महिन्यात टी२० विश्वचषक खेळवला जाणार आहे. अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेपूर्वी सूर्यकुमार पूर्णपणे तंदरुस्त होणं गरजेचं आहे. टीम इंडियाचा तो महत्वाचा खेळाडू आहे.

नमन धीरला संधी

सूर्यकुमार यादवच्या गैरहजेरीत मुंबई इंडियन्समध्ये पंजाबचा आक्रमक फलंदाज नमन धीरलला संधी देण्यात आली आहे. डाव्या हाताने फलंदाजी करणाऱ्या नमनने पहिल्या दोन सामन्यात दमदार कामगिरी केली आहे. दोन सामन्यात नमनने ५० धावा केल्यात. पण सूर्यकुमारची संघात एन्ट्री झाल्यास नमन धीरची सुट्टी होण्याची शक्यता आहे. मुंबई इंडियन्सचा तिसरा सामना सोमवारी म्हणजे १ एप्रिलला होम ग्राऊंड मुंबईत होणार आहे. मुंबई इंडियन्स राजस्थान रॉयलशी दोन हात करेल.'

# रेकॉर्डब्रेक खेळीनंतरही युवराज सिंग अभिषेक शर्मावर संतापला?





आयपीएलचा आठव्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादच्या अभिषेक शर्माने मुंबई इंडियन्सविरुद्ध ऐतिहासिक कामगिरी केली. अभिषेकने आयपीएलमध्ये वेगवान अर्धशतक ठोकले. अवघ्या १६ चेंडूत अभिषेकने अर्धशतक केले. आयपीएलच्या इतिहासातील हे सर्वात वेगवान अर्धशतक ठरले आहे. अभिषेकने आपल्या खेळीत २३ चेंडूत २७४ च्या स्ट्राईक रेटने ६३ धावा केल्या. आपल्या खेळीत अभिषेकने तब्बल ७ षटकार आणि ३ चौकार लगावले. अभिषेकने मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांची अक्षरश: पिसे काढली. अभिषेकच्या या खेळीचे चांगलेच कौतुक होतेय. पण टीम इंडियाचा माजी स्टार ऑलराऊंडर युवराज सिंग मात्र अभिषेकवर चांगलाच संतापलाय.

**युवराज सिंग अभिषेकवर संतापला**

युवराज सिंगने एक्स अकाऊंटवर अभिषेकसाठी एक पोस्ट शेअर केली आहे. यात त्याने अभिषेकचे कौतुकही केलेय आणि त्याला फटकारले देखील आहे. युवराजने आपल्या पोस्टमध्ये म्हटलेय, 'वाह! सर अभिषेक वाह, खूप चांगला खेळलाक, पण काय जबरदस्त फटका मारून आऊट झालास. लातों के भूत बातों से नहीं मानते, स्पेशल चप्पल अभिषेकची वाट पाहतेय, हेन्रिक क्लासेननेही सुंदर खेळी केली'

चांगला फॉर्मात असताना अभिषेक शर्मा मिड विकेटवर सोपा झेल देऊन बाद झाला. यावरुन युवराज सिंगने अभिषेकला फटकारले आहे.

**युवराज-अभिषेकचे नाते**

वास्तविक युवराज सिंग आणि अभिषेक शर्मा दोघंही पंजाबचे खेळाडू आहेत. अभिषेक शर्माच्या क्रिकेट कारकिर्दीत युवराज सिंगचे मोलाचे योगदान आहे. युवराजने वेळोवेळी त्याला मार्गदर्शन केलंय. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२३-२०२४ स्पर्धेत अभिषेकने तब्बल ४८५ धावा केल्या होत्या. पंजाबला ट्रॉफी जिंकून देण्यात अभिषेकने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

## आपलं मनोरंजन

# जया आणि नव्याचा श्वेताशी झाला वाद, 'या' कारणामुळे बिग बींच्या लेकीला आला राग



बॉलिवूड अभिनेता अमिताभ बच्चन यांची नात नव्या नवेली नंदा ही कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. तिचं वॉट द हेल नव्या हा पॉडकास्ट दर आठवड्याला प्रदर्शित होतो. या एपिसोडमध्ये नव्या तिची आई श्वेता आणि आजी जया बच्चन यांच्यासोबत दिसते. त्या तिघी बसून अनेक गोष्टींवर चर्चा करताना दिसतात. त्यात त्या तिघांचे त्यांच्या वयानुसार असणारे अनुभव आणि त्यासोबत त्यांची कोणत्याही गोष्टीविषयी असलेली विविध मत ऐकायला मिळतात. तर नुकत्याच प्रदर्शित झालेल्या नव्या एपिसोडचा प्रोमो नव्यानं तिच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर केला आहे. यात नव्या आणि जया बच्चन एका टीममध्ये असून श्वेताला तिच्या चुका दाखवत आहेत.

नव्यानं तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन हा प्रोमो शेअर केला आहे. हा प्रोमो शेअर करत नव्यानं कॅप्शन दिलं की वय आणि अनुभव? या तीन जनरेशन नव्या, आजी आणि आई यांच्यात हे फार मजेशीर होणार आहे. व्हिडीओमध्ये नव्या तिच्या आई आणि आजीला विचारते की जास्त चुका केल्यानं अनुभव येण्यास मदत होते? त्याचं उत्तर देत श्वेता बोलते की ''मला वाटतं की सगळ्यात चांगली गोष्ट जी तुम्ही तुमच्या मुलांसाठी करु शकता, ती ही आहे की मुलांना स्वत: चुका करु द्या.'' तर जया बच्चन म्हणाल्या, ''जेव्हा तुम्ही कोणत्या कठीण गोष्टींवर मात करता तेव्हा तुम्हाला त्यातून मिळालेला अनुभव पुढे कामी येतो.''

श्वेता पुढे बोलते की ''मला वाटतं की तरुण लोक खऱ्या आयुष्यात बदलू शकतात आणि बोलू शकतात, ही ती गोष्ट आहे जिथे तुम्ही चुकी करताना आणि तुम्हाला तुमची ती चूक आवडत नाही. नव्यानं बघा ती श्वास न घेता बोलत राहते. त्यामुळे त्यात कोणतेही मॉड्यूलेशन, पूर्णविराम आणि कॉमा नसतो.'' नव्या तिच्या आईला बोलते की ''जेव्हा तू बोलतेस तेव्हा तुझा स्वभाव हा हुकुमशाही सारखा असतो.'' जेव्हा श्वेता याचा विरोध करते तेव्हा जया बच्चन बोलतात की ''श्वेता तू करतेस. माझं ऐक.''

नव्याच्या शोविषयी बोलायचे झाले तर गेल्या एपिसोडमध्ये जया बच्चन यांनी त्यांच्या आयुष्यातील कठीण काळाविषयी चर्चा केली होती. त्यांनी सांगितलं होतं की कशा प्रकारे त्यांनी अमिताभ यांचा कठीण काळ सुरु असताना त्यांना साथ दिली होती.

# जगातील सर्वात महाग गायीचा लिलाव, तब्बल ४० कोटी रुपयांना विक्री



आज आपण अशाच एका वेगळ्या गायीची माहिती पाहणार आहोत. ज्या गायीची बाजारात ४० कोटी रुपयांना विक्री झाली आहे. ब्राझीलमध्ये या गायीला विक्रमी किंमत मिळाली आहे.

भारतासह इतर देशात विविध प्रकारच्या गायी आहेत. या गायी त्यांच्या खास वैशिष्ट्यांसाठी प्रसिद्ध आहेत. आज आपण अशाच एका वेगळ्या गायीची माहिती पाहणार आहोत. ज्या गायीची बाजारात ४० कोटी रुपयांना विक्री झाली आहे. ब्राझीलमध्ये या गायीला विक्रमी किंमत मिळाली आहे. ही गाय जगातील सर्वात महाग गाय ठरली आहे. जाणून घेऊयात या गायीबद्दल सविस्तर माहिती.

जगातील सर्वात महागडी गाय

सध्या ब्राझीलमध्ये विक्री केलेल्या एका गायीची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु आहे. ही गाय तब्बल ४० कोटी रुपयांना विकली गेलीय. ब्राझीलमध्ये साओ पावलो मधील अरांदू इथं झालेल्या लिलावात या गायीला ही विक्रमी किंमत मिळालीय. विशेष म्हणजे ही गाय भारतीय नेल्लोर वंशाची आहे. ब्राझीलमध्ये नेल्लोर आणि गीर या गायी प्रसिद्ध आहेत. ब्राझीलमध्ये ४० कोटी रुपयांना विक्री केलेली नेल्लोर वंशाची गाय जगातील सर्वात महागडी गाय ठरली आहे. ही गाय आंध्र प्रदेशातील नेल्लोर वंशाची आहे. या गायीला नेल्लोर जिल्ह्याच्या नावावरुन हे नाव ठेवण्यात आलं आहे. ब्राझीलमध्ये या जातीच्या गायीला मोठी मागणी आहे. १८६८ च्या काळात या गायीच्या प्रजाती ब्राझीलला पाठवण्यात आल्या होत्या. त्यानंतर १९६० च्या आसपास देखील या वंशाच्या गायी ब्राझीलमध्ये नेण्यात आल्या होत्या.

अतिशय उष्ण तापमानतही या गायी तग धरु शकते

नेल्लोर वंशाच्या गायी त्यांच्या वेगळेपणासाठी ओळखल्या जातात. अतिशय उष्ण तापमानतही या गायी तग धरु शकतात. ब्राझीलमध्ये तापमान जास्त असते. तरीही या गायी त्या वातावरणात तग धरु शकतात. ही पैदासासाठी देखील पाळली जाते. या गायींपासून चांगल्या प्रकारची वासरे तयार केली जातात. ब्राझीलमधील जवळपास ८० टक्के लोकांकडे याच वंशाच्या गायी आहेत.

**नेल्लोर जातीच्या गायीचं वेगळेपण काय?**

नेल्लोर जातीच्या गायी या पांढऱ्याशुभ्र असतात. ब्राझीलमध्ये ८० टक्के गायी या नेल्लोर जातीच्या नेल्लोर जातीच्या गायीची दूध देण्याची क्षमताही चांगली आहे. गायीची त्वचा डा आहे, त्यामुळं कोणत्याही किटकांचा प्रभाव होत नाही

उष्ण वातावरणातही नेल्लोर जातीच्या गायी तग धरु शकतात.

# उन्हाळ्याची झळ लागू लागली; काय काळजी घ्याल?



उन्हाळा म्हणजे अंगाची काहिली होणे, रखरखीतपणा, उष्माघात, घामाच्या धारा - असं काय काय मनात येते. अशावेळी जीव नकोसा होतो. मे महिन्यामध्ये सर्वत्र तापमान वाढू लागले व घामाघूम व्हायला झाले की सर्वांना उन्हाळ्याची झळ लागते. मुंबईमध्ये भरपूर घाम येतो तर देशावर उन्हाळी लागते तर उन्हाळ्यात शरीराची कशी काळजी घ्यायची ते बघूया. उन्हाळ्यामध्ये मुख्यत्वे त्वचा, केस, पाय यांचे विकार आणि तीव्र उन्हामुळे येणारी तिरमिरी, उष्माघात या आरोग्यविषयक समस्या येतात.

उष्माघात - ही जास्त तापमानामुळे झालेली एक तीव्र समस्या असते. यामध्ये शरीरात जास्त उष्णता शोषून घेतली जाते. यामुळे रक्तदाब कमी होतो व मेंदूवरही परिणाम होऊ शकतो. हा गंभीर आजार असून त्यास त्वरित वैद्यकीय उपचारांची गरज असते.

**उन्हाळ्याचा आपल्या त्वचेवर कसा प्रभाव पाडतो?**

उन्हाळ्यात खूपजणांना त्रास होतो तो म्हणजे घामोळ्यांचा व फोडांचा. अनेकजण याचा संबंध आंबे खाण्याशी जोडतात जे साफ चुकीचे आहे. त्वचेचा शुष्कपणा, वाढलेले घामाचे प्रमाण व धूळ यामुळे हे फोड येऊ लागतात. घामोळ्यांचा त्रास टाळण्यासाठी थंड पाण्यानेच आंघोळ करायला लागावे. (थंड शॉवर, बाथ किंवा स्पंज बाथ). पातळ व सैलसर कपडे घालावेत ज्याअन्वये हवा खेळत राहील. आंघोळीनंतर शरीराला टाल्कम पावडर लावावी. कुठे पुरळ (स्किन रॅश) असल्यास लरश्ररवीूश्र किंवा तत्सम लोशन लावावे.

उन्हाळ्यात आपल्या पायांना, मुख्यत्वे अंगठा व बोटे यांना त्वचेच्या रुक्षतेमुळे व धुळीमुळे जंतूसंसर्ग होऊ शकतो. बाहेरून आल्यानंतर पाय चांगले चोळून धुवावेत व आवश्यक असल्यास त्वचा मुलायम ठेवणारे मलम ोर्ळीीीळीशी लावावे. तसेच उष्णता व घाम यामुळे डोक्यामध्ये कोंडा होण्याचे प्रमाणही उन्हाळ्यात वाढते.

आर्द्रता आणि उष्मासह एकत्रित परिणामामुळे तेलकट त्वचा अधिक तेलकट दिसते आणि कोरडी त्वचा खडबडीत दिसते. सूर्यकिरणांची तीव्रता अधिक मेलेनिन रंगद्रव्ये तयार करून काळवंडण्यास कारणीभूत ठरू शकते. उन्हाळ्यात आपली त्वचा जपणे फार महत्वाचे ठरते. म्हणून उन्हात बाहेर जाताना शरीरावर सनस्क्रीन लोशन लावावे. यामुळे व णतर आणि णतल या किरणांमुळे रक्षण केले जाते. उन्हाळ्यात खूप मेकअप करणे टाळावे. कारण वातावरणातील रुक्षता व आर्द्रता याने त्वचेची रंध्रे आधीच योग्यरीत्या काम करू शकत नाही. अति मेकअपमुळे ती बंद होतात व त्यामुळे त्वचेला अजिबात श्वास घेता येत नाही. आहारात संत्री, मोसंबी यासारखी फळे, हिरव्या पालेभाज्या, गाजर, शेंगदाणे व तृणधान्ये यांचा समावेश असावा म्हणजे त्वचा तुकतुकीत राहते. याबरोबर अँटी ऑक्सिडंट्सही घ्यावीत ज्यामुळे त्वचेतील आर्द्रता राखली जाते व त्वचेला इजा संभवत नाही.

घामाच्या जास्त प्रमाणामुळे उन्हात जास्त फिरल्यास, श्रम अधिक केल्यास किंवा खेळल्यास हातापायात पेटके (डीर्रीि) येतात. पोटऱ्यांमध्ये गोळे येतात. अशावेळी थंड सावलीच्या ठिकाणी आराम करावा, मीठ साखर घातलेले पाणी किंवा फळांचा रस भरपूर प्रमाणात घ्यावे व लागलीच कडक उन्हात जाऊ नये. उन्हाळ्यातील प्रचंड उष्णतेमुळे व निथळणाऱ्या घामामुळे शरीरातील पाणी सतत बाहेर जात असते. त्यामुळे अशक्तपणा, डोकेदुखी, चक्कर, मळमळ, पायात पेटके येणे सहज शक्य आहे. अशावेळी भरपूर पाणी, सरबत किंवा नारळपाणी प्यावे.

उन्हाळ्यातील आहार विहार

उन्हाळ्यात घसा कोरडा पडतो म्हणून अति थंडगार पाणी पिऊ नये. शरीराच्या तापमानात साजेल असेच पाणी प्यावे. शरीराचे वाढणारे तापमान बाह्य तसंच अंतर्गत अवयवांना नुकसान पोहोचवू शकते. त्यामुळे माध्यान्हीचे प्रखर ऊन टाळलेलेच बरे. तसेच आत्यंतिक श्रम व व्यायाम टाळावा. उन्हाळ्याची तीव्रता कमी करण्यासाठी व शरीराला उन्हाळ्याचा कमी त्रास होण्यासाठी आपण आहारात थोडा बदल करणे उचित ठरते. हिवाळ्यापेक्षा उन्हाळ्यात अन्न पचायला जड असते म्हणून उन्हाळ्यात भुकेपेक्षा एक घास कमीच घ्यावा.

आहारात भात, रताळी, गाजर, बीट, सुरण तसेच भेंडी, फ्लॉवर, पडवळ दोडकी या सारखे मधुर रस असलेले अन्नपदार्थ असावेत. दही, ताक व लस्सी या उन्हाळ्यात लाभकारक ठरतात. आंबट पदार्थ जसे की कैरी, पन्हे, कोकम सरबत, हे उष्णता कमी करतात व शरीर शीतल ठेवतात. जेवणामध्ये मसाल्याचे पदार्थ कमी असावेत. व ते भरपूर प्रमाणात घ्यावे. धणे, जिऱ्याचे पाणी हे अन्नपचनास पूरक असते व शरीराला थंडपणा आणतात.

# बच्चन कुटुंबापासून दूर होणार आराध्या; ऐश्वर्या-अभिषेकने घेतला महत्त्वाचा निर्णय



मागील काही महिन्यांपासून बॉलिवूडचे शहेनशाह 'बिग बी' अमिताभ बच्चन यांच्या कुटुंबात सगळं काही आलबेल नसल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच आता ऐश्वर्या राय आणि अभिषेकची मुलगी आणि अमिताभ-जया बच्चन यांची लाडकी नात आराध्या ही बच्चन कुटुंबियांपासून दूर राहणार असल्याचे वृत्त आहे. आराध्याबाबत ऐश्वर्या-अभिषेकने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

बॉलिवूडमध्ये काही सेलिब्रिटींनी आपला ठसा उमटवला आहे. सुपरस्टार कलाकारांच्या घरात काय चाललंय हे जाणून घेण्याची चाहत्यांची इच्छा असते. बॉलिवूडमधील काही मोजक्या कुटुंबांबद्दल, त्यांच्या घरात काय सुरू आहे, हे जाणून घेण्याची इच्छा असते. अमिताभ बच्चन यांच्या कुटुंबाबाबत अशीच उत्सुकता असते.

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन यांनी आराध्याच्या भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वृत्तानुसार, आराध्या बच्चन ही आपल्या पुढील शिक्षणासाठी परदेशात जाऊ शकते. त्यामुळेच ऐश्वर्याने यंदाची धुळवड आराध्यासाठी खास केली. आता, आराध्या पुढील काही वर्ष परदेशात असण्याची शक्यता आहे.

सध्या आराध्या बच्चन मुंबईच्या धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिकत आहे. या परीक्षेनंतर आराध्या ही पुढील शैक्षणिक वर्षात दहावीत असेल. त्यानंतर ती आपलं पुढील शिक्षण हे लंडन किंवा न्यूयॉर्कमध्ये घेणार असल्याची शक्यता आहे.

# अरविंद केजरीवाल यांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्याची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

**नवी दिल्ली :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केल्यानंतर त्यांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्याची मागणी करणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. हे राजकीय प्रकरण असल्याने न्यायव्यवस्थेच्या कक्षेत येत नाही. त्यामुळं यात न्यायालयीन हस्तक्षेपाची गरज नसल्याचे मत दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मनमोहन यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं व्यक्त केलय. असा कोणताही कायदा सांगा, ज्यामध्ये मुख्यमंत्र्यांना पदावरून हटवण्याची तरतूद आहे, अशी देखील विचारना न्यायालयानं केलीय.

न्यायालयीन हस्तक्षेपाला वाव नाही : या प्रकरणात घटनात्मक बिघाड होत असल्यास देशाचे राष्ट्रपती तसंच नायब राज्यपाल त्यावर निर्णय घेतील, असं न्यायालयानं म्हटलं आहे. या प्रकरणात न्यायालयीन हस्तक्षेपाला वाव नसल्याचंही न्यायालयानं म्हटलं. आज आम्ही वर्तमानपत्रात वाचलं, नायब राज्यपाल या प्रकरणाची चौकशी करत आहेत. त्यानंतर ते राष्ट्रपतींकडं जाईल. प्रत्येक कामासाठी स्वतंत्र प्रक्रिया आहे. त्यामुळं यात हस्तक्षेप करता येणार नाही. दिल्लीतील

## १ एप्रिलपर्यंत ईडी कोठडीत वाढ



सामाजिक कार्यकर्ते सुरजित सिंह यादव यांनी केजरीवाल यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मुख्यमंत्र्यांवर आर्थिक घोटाळ्याचे आरोप असून त्यांना या पदावर राहण्याचा अधिकार नसल्याचं यादव यांनी याचिकेत म्हटलं आहे.

सरकार तुरुंगातून चालवलं जाणार नाही : दारू घोटाळ्यात केजरीवाल यांच्या अटकेनंतर तुरुंगातून सरकार चालवण्यावरून वाद सुरू झाला आहे. दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही.के सक्सेना यांनी बुधवारी म्हटले की, केजरीवाल तुरुंगातून सरकार चालवू शकत नाहीत. एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात सक्सेना म्हणाले की, मी दिल्लीतील जनतेला आश्वासन देऊ इच्छितो की, सरकार तुरुंगातून चालवलं जाणार नाही.

२१ मार्च रोजी ईडीकडून अटक : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सुमारे दोन तासांच्या चौकशीनंतर २१ मार्च रोजी ईडीनं त्यांच्या अधिकृत निवासस्थानातून अटक केली होती. दिल्ली दारू घोटाळ्यात राऊस एव्हेन्यू कोर्टानं त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडीत पाठवलं होतं. अटक झाल्यानंतरही अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिलेला नाही. ते दिल्लीचे मुख्यमंत्री राहतील आणि गरज पडल्यास तुरुंगातून सरकार चालवतील, असे आम आदमी पक्षाने म्हटले होते.

केजरीवाल तपासात सहकार्य करत नाहीत : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अंमलबजावणी संचालनालयाने गुरुवारी विशेष न्यायालयात हजर केले. ईडीने पुन्हा केजरीवाल यांची सात दिवसांची कोठडी देण्याची मागणी केलीय. केजरीवाल तपासात सहकार्य करत नसल्याचे ईडीने म्हटले आहे.

त्याचवेळी अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या अटकेवर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी विचारले मला का अटक करण्यात आली? माझ्यावर कोणताही आरोप नाही. माझ्या अटकेसाठी पुरेसे कारणे आहे का? मला अद्याप कोणत्याही न्यायालयाने दोषी ठरवले नाही, मग मला अटक का केली? माझ्यावर कोणताही आरोप नाही.

काय होते नवीन दारू धोरण : २२ मार्च २०२१ रोजी मनीष सिसोदिया यांनी नवीन दारू धोरण जाहीर केले होते. १७ नोव्हेंबर २०२१ रोजी नवीन मद्य धोरण म्हणजेच उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२ लागू करण्यात आले. नवीन दारू धोरण आल्यानंतर सरकार दारू व्यवसायातून बाहेर पडले. त्यामुळे संपूर्ण दारूची दुकानं खासगी व्यावसायिकांच्या हातात गेली. नवे धोरण आणण्यामागे सरकारचा महसूल वाढण्यास आणि अवैध विक्रीला आळा बसणार असल्याचे म्हटले जात होते. मात्र, नवीन धोरण सुरुवातीपासूनच वादात राहिले. त्यामुळे २८ जुलै २०२२ रोजी सरकारने नवीन दारू धोरण रद्द करून जुने धोरण पुन्हा लागू केले.

# १.५ कोटींचे घर, जमीन, स्कूटर...; निवडणुकीसाठी पैसे नाहीत म्हणणाऱ्या निर्मला सीतारमन यांची सपंत्ती किती?



**दिल्ली :** लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी अनेक उमेदवार प्रयत्न करत आहेत. एकीकडे उमेदवारांमध्ये रस्सीखेच सुरु असताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मात्र भाजपाचा निवडणूक लढवण्याचा प्रस्ताव नाकारला आहे. देशाची अर्थव्यवस्था सांभाळणाऱ्या निर्मला सीतारमन यांनी आपल्याकडे लोकसभा निवडणूक लढण्यासाठी पुरेसा पैसा नसल्याचे कारण सांगितले आहे. दरम्यान आपल्याकडे तितका पैसा नाही म्हणणाऱ्या निर्मला सीतारमन यांच्याकडे नेमकी किती संपत्ती आहे हे जाणून घ्या...

**निर्मला सीतारमन यांची संपत्ती किती?**

निर्मला सीतारमन यांच्या विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यांनी सांगितलं आहे की, भाजपाध्यक्ष जे पी नड्डा यांनी त्यांना आंध्रप्रदेश किंवा तामिळनाडूमधून निवडणूक लढण्याचा पर्याय दिला होता. पण लोकसभा निवडणूक लढण्यासाठी लागणारा तितका निधी माझ्याकडे नसल्याने नकार दिला आहे.

निर्मला सीतारमन यांनी २०१९ मध्ये निवडणूक आयोगाकडे दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, त्यांची संपत्ती २ कोटींपेक्षा अधिक आहे. तसंच त्यांच्यावर ३० लाखांपेक्षा अधिक कर्ज आहे.

पीएमओ वेबसाईटवर देण्यात आलेल्या माहितीनुसार, २०२२ मध्ये निर्मला सीतारमन यांच्याकडे फक्त ७३५० रुपये रोख आणि सर्व बँक खात्यात ३५ लाख ५२ हजार ६६६ रुपये जमा आहेत. तसंच पीपीएफमध्ये त्यांनी १ लाख ५९ हजार ७६३ रुपये गुंतवले आहेत. याशिवाय म्युच्युअल फंडात ५ लाख ८० हजार ४२४ रुपयांची गुंतवणूक आहे. त्यांच्याकडे कोणतीही जीवन विमा योजना नाही. तसंच एलआयसी किंवा इतर कोणताही विमा घेतलेला नाही.

निर्मला सीतारमन यांनी जाहीर केलेल्या संपत्तीनुसार, त्यांच्याकडे एकही कार नाही. त्यांच्याकडे फक्त बजाज चेतक स्कूटर आहे, ज्याची किंमत २८ हजार २०० रुपये आहे. दागिन्यांबद्दल बोलायचं गेल्यास २०२२ मध्ये त्यांच्याकडे एकूण १८ लाख ४६ हजार ९८७ रुपयांचे दागिने होते. यामधील ३१५ ग्रॅम सोनं होतं. आजच्या तारखेला त्यांच्याकडे असणाऱ्या सोन्याच्या दागिन्यांची किंमत २० लाख रुपये आहे.

निर्मला सीतारमन यांच्या स्थावर मालमत्तेबद्दल बोलायचं गेल्यास तेलंगणामधील हैदराबादमध्ये एक आलिशान घर आहे. ज्याची किंमत १ कोटी ७० लाख ५१ हजार ४०० रुपये आहे. याशिवाय त्यांच्याकडे एक बिगरशेती जमीन आहे ज्याची किंमत १७ लाख ८ हजार ८०० रुपये आहे.

निर्मला सीतारमन यांच्याकडे २ कोटींची संपत्ती असून, डोक्यावर लाखोंचं कर्जही आहे. १९ वर्षापूर्वीचं गृहकर्ज, एक वर्षाचा ओव्हरड्राफ्ट आणि १० वर्षाचं मॉर्गेज लोन आहे.

निवडणूक आयोगानुसार, लोकसभा निवडणूक लढणारा उमेदवार जास्तीत जास्त ९५ लाख रुपये खर्च करु शकतो. तसंच निवडणूक लढण्यासाठी पैसे कुठून आणले हेदेखील सांगावं लागतं. अनेक उमेदवारांची आर्थिक स्थिती चांगली असतानाही पक्षातून त्यांनी निवडणूक लढण्यासाठी निधी मिळतो. पण तरीही उमेदवाराला खर्चाचा हिशोब द्यावा लागतो.

# अरुणाचल प्रदेशसह लक्षद्वीपमध्ये राष्ट्रवादीला घड्याळ चिन्ह मिळणार

## राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांचा दावा

**ठाणे :** अरुणाचल प्रदेश येथील होणाऱ्या विधानसभेच्या व लक्षद्वीपमधील लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना घड्याळ हे चिन्हच मिळणार असल्याचा दावा पक्षाचे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला लक्षद्वीपमध्ये घड्याळ हे चिन्ह मिळणार नाही, अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्र आणि नागालँडमध्ये राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त पक्ष आहे. पॅरा १० इलेक्शन्स सिंबल रिझर्वेशन अँड लॉटमेंट ऑर्डर १९६८ च्या आदेशान्वये केंद्रीय निवडणूक आयोगाकडे आम्ही अर्ज केला होता. अरुणाचल प्रदेश येथे होणाऱ्या विधानसभेच्या सर्व जागांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना घड्याळ हे चिन्ह मिळणार आहे. त्याचप्रमाणे लक्षद्वीपमधील लोकसभा निवडणुकीत देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व उमेदवारांना घड्याळ हे चिन्हच मिळणार आहे. तशाप्रकारची अधिसूचना २३ मार्चला अरुणाचल प्रदेशबद्दल निवडणूक आयोगाने काढली आहे आणि लक्षद्वीपबद्दलही काढण्यात आली आहे, असा दावा परांजपे यांनी केला आहे.



**बसवराज पाटील यांच्या भाजप प्रवेशाचा काँग्रेसला फटका किती ?**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे एक ज्येष्ठ नेते जे कायम हे वाक्य वापरतात की टप्प्यात आल्यावर कार्यक्रम करायचा असतो.

पण, चुकीच्या माहितीवर आधारित कार्यक्रम करायला गेलो की कार्यक्रम इनकरेक्ट होतो. हे या राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्याने लक्षात ठेवावे, असा सल्लाही त्यांनी दिला. तसेच कुठल्याही प्रकारचे गैरसमज माध्यमांनी देखील पसरवू नये अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

संजय राऊत यांना टोला

आजपर्यंत महाविकास आघाडीच्या ज्या काही बैठका झाल्या अनेक बैठका ट्रायडंटमध्ये झाल्या, अनेक बैठका वरळी येथील फोर सिजन्सवरही झाल्या. तिथे महाविकास आघाडीच्या शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या काय कुस्त्या झाल्या हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिल्या आहेत. त्यामुळे पालघर व ठाणे या दोन्ही जिल्ह्यांमधील चारही लोकसभेच्या जागांवर महायुतीचेच उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. संजय राऊत यांनी याबद्दल काळजी करण्याची गरज नाही, असा टोला परांजपे यांनी लगावला.

**जागांवर दावा केला नाही**

ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण, भिवंडी व पालघर जिल्ह्यातील पालघर या चारही लोकसभेच्या जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने दावा केला नव्हता. त्यामुळे शिवसेना व भाजप या दोन्ही पक्षात अंतिम निर्णय होईल. भिवंडीच्या जागेची उमेदवारी भाजपने केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांना जाहीर केलेली आहे. उरलेल्या तीनही जागांबाबत शिवसेना व भाजपमध्ये उत्तम ताळमेळ आहे, ते या तीनही जागेवरील उमेदवार लवकरच जाहीर करतील, असेही परांजपे यांनी सांगितले.

## काँग्रेस पक्षाला आणखी एक भगदाड! भारतातील सर्वात श्रीमंत महिलेने सोडला पक्ष

**राजदंड न्युज नेटवर्क** लोकसभा निवडणूकीच्या पाशर्वभूमीवर बडे-बडे नेते काँग्रेस पक्षाची साथ सोडून देत आहेत. त्यामुळे काँग्रेस पक्ष चांगलाच अडचणीत सापडला आहे. त्यातच आता भारतातील सर्वात श्रीमंत महिला सावित्री जिंदाल यांनीदेखील काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला आहे.

नुकतेच काँग्रेस नेते नवीन जिंदाल यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. भाजपाकडून त्यांना कुरुक्षेत्र मतदारसंघातून उमेदवारीही दिली आहे. तर आता नवीन जिंदाल यांची आई सावित्री जिंदाल यांनी काँग्रेस पक्षाचा सदस्यत्वाचा राजीनामा देत काँग्रेस पक्ष सोडून दिला आहे. अशी माहिती सावित्री जिंदाल यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली आहे.

''मी १० वर्षे आमदार म्हणून हिसारच्या जनतेचे प्रतिनिधित्व केले आणि मंत्री म्हणून नि:स्वार्थपणे हरियाणा राज्याची सेवा केली. हिसारची जनता हे माझे कुटुंब आहे आणि माझ्या कुटुंबाच्या सल्ल्यानुसार मी आज काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. काँग्रेस नेतृत्वाच्या पाठिंब्याबद्दल आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांचा मी सदैव ऋणी राहीन ज्यांनी मला नेहमीच पाठिंबा आणि आदर दिला'', असे सावित्री जिंदाल यांनी सांगितले.

# कंबोडियात ५ हजार भारतीयांना बनवलं 'सायबर गुलाम', ५०० कोटींचा घोटाळा?

**राजदंड न्युज नेटवर्क :** कंबोडिया या देशामध्ये तब्बल ५ हजार भारतीय अडकले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ५ हजार भारतीयांची फसवणूक करत त्यांना नोकरी आणि इतर काही गोष्टींचे आमिष दाखवून गुलाम बनवण्यात आले आहे. या प्रकरणामध्ये अधिकारी असल्याचे भासवून लोकांची फसवणूक करत लाखो रूपये उकळल्याचा अंदाजही व्यक्त करण्यात येत आहे. कंबोडियामध्ये ५ हजारांहून अधिक भारतीयांना वेठीस धरण्यात आले असून त्यांच्याकडून चुकीचे कामे करून घेतले जात आहे. कंबोडियामध्ये अडकलेल्या भारतीयांच्या सुटकेसाठी आता केंद्र सरकारकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

कंबोडिया हे एक सायबर गुलामगिरीचे केंद्र मानले जाते. कंबोडियामध्ये अडकलेल्या या लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध काम करण्यास भाग पाडले जात असून त्यांच्याकडून सायबर फसवणुसारखे कामे करून घेतले जाते. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे कंबोडियातील लोक जास्त करून भारतीयांनाच फसवत असल्याचा अंदाज आहे.

भारत सरकारच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. यामध्ये गृह मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर सुरक्षेसंदर्भातील अधिकारी यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत कंबोडियामध्ये अडकलेल्या भारतीयांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच कंबोडियात अडकलेल्या भारतीयांची सुटका करण्यासाठी काय रणनीती तयार करता येईल? यासंदर्भात चर्चा झाली.

सहा महिन्यांत ५०० कोटी रुपयांची फसवणूक?

'इंडियन एक्स्प्रेस'ने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तात म्हटले की, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पार पडलेल्या या बैठकीचा अजेंडा हा या रॅकेटसंदर्भात चर्चा करणे आणि तेथे अडकलेल्या लोकांना परत आणणे हा होता. तसेच गेल्या सहा महिन्यांत कंबोडियामधून सायबर फसवणुकीतून भारतात ५०० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.

# 'व्याभिचार केल्यास महिलांना खुलेआम दगडाने ठेचून मारले जाणार' तालिबानची घोषणा



**राजदंड न्युज नेटवर्क** अफगाणिस्तानमध्ये पुन्हा एकदा महिलांविरोधात हीणकस आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या शिक्षा देण्याचा प्रघात तालिबानकडून सुरू करण्यात येत आहे. व्याभिचाराबद्दल यापुढे महिलांना सार्वजनिक ठिकाणी दगडाने ठेचून मारण्याची शिक्षा पुन्हा सुरू करण्यात येत असल्याची घोषणा करण्यात आली आहे. तालिबानचे प्रमुख नेते मुल्ला हिबतुल्ला अखुंदजादा यांनी ही ही घोषणा केली असून त्यांचा संदेश मागच्या शनिवारी टीव्हीवर दाखविण्यात आला, असे वृत्त टेलिग्राफने दिले आहे.

टेलिग्राफने या व्हिडिओला प्रसारित केले असून त्यामध्ये अखुंदजादा म्हणतो की, आंतरराष्ट्रीय समुदाय स्त्रियांच्या ज्या हक्कांची वकिली करतो, ते हक्क तालिबानच्या इस्लामिक शरियाच्या व्याख्येविरोधात आहे. तुम्ही म्हणता की, महिलांना दगडाने ठेचून जीवे मारणे महिलांच्या अधिकारांच्या विरोधात आहे. तर आम्ही सांगू इच्छितो की, आम्ही लवकरच व्याभिचाराच्या विरोधात या शिक्षेची अंमलबजावणी करणार आहोत. आम्ही महिलांना सार्वजनिक ठिकाणी उभे करून फटके मारू. त्यांना दगडाने ठेचून टाकू.

अखुंदजादा पुढे म्हणाला की, फक्त काबूल ताब्यात घेऊन तालिबानचे काम संपलेलेल नाही, आता तर आमचे काम सुरू झाले आहे. २०२१ साली पुन्हा एकदा अफगाणिस्तानात तालिबानची राजवट सुरू झाल्यापासून येथील महिलांना अनेक अडचणींचा आणि आव्हानांचा सामना करावा लागत आहे. तालिबानच्या राजवटीत मुली, महिलांना शिक्षण घेण्याची परवानगी नाही, त्यांना रोजगार करता येत नाही, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाही.

तालिबान सत्तेत आल्यानंतर लगेचच पहिल्या महिन्यात मुलींना माध्यमिक शाळेत जाण्यापासून रोखण्यात आले. त्यानंतर डिसेंबर २०२२ मध्ये विद्यापीठाचे दरवाजेही बंद करण्यात आले.

## देशात लवकरच धावणार बुलेट ट्रेन; काम प्रगतिपथावर

**राजदंड न्युज नेटवर्क :** मुंबई आणि अहमदाबाद या दोन शहरादरम्यान धावणाऱ्या बुलेट ट्रेनबाबत एक मोठी माहिती समोर आली आहे. या हाय-स्पीड बुलेट ट्रेनसाठी देशातील पहिली बॅलेस्टलेस ट्रॅक सिस्टिम बनवण्याचे काम प्रगतीपथावर आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विटरवर या प्रकल्पाचा एक व्हिडिओ शेअर केला असून, व्हिडिओद्वारे प्रकल्पाच्या कामाविषयी माहिती देण्यात आली आहे.

भारतात पहिल्यांदाच मुंबई-अहमदाबाद हायस्पीड बुलेट ट्रेनसाठी विशेष ट्रॅक सिस्टम तयार करण्यात येत आहे. याला बॅलेस्टलेस ट्रॅक सिस्टीम म्हणतात. या ट्रॅक सिस्टीममध्ये प्रामुख्याने ४ भाग आहेत. आरसी ट्रॅक बेड, सिमेंट मोर्टार, प्रीकास्ट ट्रॅक स्लॅब आणि फास्टनर्ससह रेल. दोन शहरांमध्ये प्री-कास्ट आरसी ट्रॅक स्लॅब तयार केले जात आहेत. गुजरातच्या आनंद आणि किममध्ये हे काम सुरू आहे. हे ट्रॅक बांधण्याचे काम वेगाने सुरू आहे. ही अनोखी ट्रॅक सिस्टीम उत्कृष्ट अभियांत्रिकीचे आणि मेक इन इंडियाचे उत्तम उदाहरण आहे. या वेगवान ट्रेनचे जोरदार वारा किंवा वादळामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी विशेष पावले उचलली जात आहेत. यासाठी ५०८ किलोमीटरच्या मार्गावर १४ ठिकाणी वाऱ्याचा वेग मोजण्यासाठी निमोमीटर बसवण्यात येणार आहे. नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने सांगितले की, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉर देशाच्या पश्चिम भागातील किनारी भागातून जाईल, जिथे वाऱ्याचा वेग काही विशिष्ट भागात केंद्रित आहे.

# १७०० कोटींच्या नोटीशीनंतर राहुल गांधींचा सीबीआय, ईडीला इशारा

**राजदंड न्युज नेटवर्क :** प्राप्तिकर विभागाकडून काँग्रेस पक्षाला १७०० कोटी रुपयांची नोटीस मिळाल्यानंतर काही तासातच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी भाजपावर निशाणा साधला आहे. जेव्हा केव्हा भाजपाचे सरकार उलथेल तेव्हा ज्यांनी ज्यांनी लोकशाही उध्वस्त करण्यात हातभार लावला त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशाराच राहुल गांधी यांनी दिला. अशा कारवाईमुळे भविष्यात कुणीही लोकशाहीला नख लावण्याचा प्रयत्न करणार नाही, यावरही राहुल गांधी यांनी जोर दिला.

काँग्रेस पक्षाने नुकतीच एक पत्रकार परिषद घेऊन भाजपावर कर दहशतवाद माजवल्याचा आरोप केला होता. अशा कारवाईमुळे निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांना आर्थिक पंगू केले जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला. काँग्रेसचे खासदार जयराम रमेश म्हणाले की, काँग्रेसने लोकसभेत कडवी झुंज देऊ नये म्हणून आम्हाला आर्थिकरित्या पंगू केले जात आहे.



काँग्रेसच्या एक्स अकाऊंटवर राहुल गांधी यांचा १५ मार्चचा एक व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये राहुल गांधी म्हणतात की, सीबीआय आणि ईडी सारख्या संस्था भाजपाप्रणीत सरकारच्या इशाऱ्यावर काम करत आहेत. ज्यावेळी सरकार बदलेल, तेव्हा या संस्थावर कारवाई करण्यात येईल. जर या संस्थांनी आपले काम व्यवस्थित केले असते तर आम्हाला अडचण नव्हती. पण जेव्हा भाजपाचे सरकार बदलेल तेव्हा त्यांना कारवाईला सामोरे जावे लागेल आणि मी गॅरंटी देतो सदर कारवाई इतकी कडक असेल की, पुन्हा कोणतीही संस्था असे काम करण्याचा विचार करणार नाही.

दुसरीकडे काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जू खरगे यांनीही प्राप्तिकर विभागाच्या नोटिशीवर संताप व्यक्त केला. भाजपा सरकार ईडी, प्राप्तिकर विभाग आणि सीबीआय सारख्या संस्थांचा गैरवापर करून लोकशाहीला कमकुवत करत आहे आणि संविधानाचे महत्त्व कमी करत आहे. तसेच प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला नामोहरण करण्यासाठी प्राप्तिकर विभागाचा हत्यारासारखा वापर केला जात आहे, असाही आरोप खरगे यांनी केला. मात्र अशा कारवायांमुळे घाबरून जाऊन काँग्रेस आगामी लोकसभा निवडणूक लढविण्याचे सोडणार नाही. आम्ही याचा जोमाने सामना करू आणि भाजपाच्या हुकूमशाहीतून देशाच्या संस्थांना मुक्त करू.

दरम्यान प्राप्तिकर विभागाने या आठवड्यात काँग्रेस पक्षाला मागील वर्षांच्या कर परताव्यात विसंगती आढळल्याबद्दल १७०० कोटींची नोटीस पाठविली आहे. तसेच २०१७-१८ आणि २०२०-२१ मधील करासंबंधीचा दंड, त्यावरील व्याज यासंबंधीचाही उल्लेक सदर नोटिशीत आहे.

दुसरीकडे वर्ष २०१४-२०२१ या काळात एकूण ५२३.८७ कोटी रुपयांच्या बेहिशेबी व्यवहार प्रकरणी प्राप्तिकर विभागाकडून सदर नोटीस बजावण्यात आल्याचे सांगितले गेले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी प्राप्तिकर विभागाने टाकलेल्या छाप्यामध्ये ५२३.८७ कोटी रुपयांचे बेहिशेबी व्यवहार आढळून आले होते, असेही सांगितले जाते.

मार्च महिन्यात काँग्रेस पक्षाने प्राप्तिकर लवादासमोर (खढ-ढ) समोर केलेले अपील गमावले होते. काँग्रेसच्या बँक खात्यातून प्राप्तिकर विभागाने १३५ कोटी काढून घेण्यास स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र प्राप्तिकर लवादाने काँग्रेसची मागणी फेटाळून लावली. २२ मार्च रोजी प्राप्तिकर विभागाच्या शोधमोहिमेला स्थगिती देण्यासाठी काँग्रेसने उच्च न्यायालयात केलेली याचिकाही फेटाळण्यात आली. त्यामुळे जाणूनबुजून निवडणुकीच्या तोंडावर अशी कारवाई करण्यात येत आहे, तसेच आमच्या अपीलावर न्याय देण्यासाठी वेळ घालवला जात आहे, असा आरोप काँग्रेसने लावला.